या जगतामध्ये दोन प्रकारचे लोक आपल्याला दिसून येतात. एक शास्त्रविधी जाणून कर्म करणारे आणि दुसरे शास्त्रविधी न जाणता पण भावयुक्त व श्रध्दायुक्त अंत:करणाने कर्म करणारे आहेत. त्यातील शास्त्रविधी जाणून कर्म करणार्यांना केलेल्या कर्माचे फळ मिळणार हे निश्चितच आहे पण जे शास्त्रविधी जाणत नाहीत परंतु अत्यंत श्रध्देने कर्म करतात त्या मनुष्यांना केलेल्या कर्माचे फळ मिळते का?
आजच्या या कलियुगामध्ये शास्त्रविधी न जाणता कर्म करणारेच लोक जास्त दिसून येतात.मग त्यांची स्थिती काय होते ?असा प्रश्न अर्जुन भगवंतांना विचारतात.

ये शास्त्रविधिमुत्सृज्य यजन्ते श्रध्दयान्विता:||
तेषां निष्ठा तु का कृष्ण सत्वमाहो रजस्तम:||{भ.गी.१७/१}

शास्त्रविधी जाणून घेण्यासाठी ज्ञान असण्याची आवश्यकता असते पण कलियुगामध्ये मनुष्याकडे ज्ञानाची कमी आहे.दुसरा उपाय हा आहे कि सन्त-महात्म्यांच्या संगतीत राहून शास्त्रविधींचे ज्ञान होते. पण या कलियुगामध्ये खरे ज्ञानी सन्त-महात्मे कोण हे ओळखणे देखील कठीण आहे.वर प्रतिपादन केलेल्या दोन्ही माध्यमातून शास्त्रविधींचे ज्ञान होणे अशक्य दिसते. ज्यांना शास्त्रविधींचे ज्ञान नाही पण जे श्रध्देने कर्म करतात त्यांची स्थिती काय होते किंवा ती श्रध्दा फलद्रुप होते का? या प्रश्नाला उत्तर देताना भगवान सांगतात की,

त्रिविधा भवति श्रध्दा देहिनां सा स्वभावजा ||
सात्विकी राजसी चैव तामसी चेति तां श्रुणु|| {भ.गी.१७/२}

श्रध्दा ही तीन प्रकारची असते. १.शास्त्रजा , २.संगजा आणी ३.स्वभावजा.

१.शास्त्रजा श्रध्दा-शास्त्रात् जायते इति शास्त्रजा |

शास्त्रादिकांच्या अध्ययनातून उत्पन्न होणारी श्रध्दा.

२.संगजा श्रध्दा - सत्संगात् जायते इति संगजा |

सन्त-गुरु- महात्म्यांच्या संगतीत राहून उत्पन्न होणारी श्रध्दा.

ISBN No: 978-81-94206-6-0

३.स्वभावजा श्रध्दा- स्वभावात् जायते इति स्वभावजा |

श्लोकातील सा स्वभावजा या पदाने स्वभावातून व संस्कारातून उत्पन्न झालेली श्रध्दा ती स्वभावजा श्रध्दा होय. ती शास्त्रांदिकांच्या अध्ययनातून उत्पन्न होत नाही तसेच सत्संगातून सुध्दा निर्माण होत नाही.अशाप्रकारची स्वभावजा श्रध्दा सुध्दा तीन प्रकारची आहे.

सात्विकी स्वभावजा ,राजसी स्वभावजा , तामसी स्वभावजा होय.राजसी व तामसी या दोन्ही श्रध्दा आसुरी संपत्तीमध्ये येतात कारण दोन्हींचेही फळ" बन्धन" आहे. "निबन्धाय आसुरीमता" {भ.गी.१६/५} मात्र या दोन्हींच्या बन्धनाच्यादृष्टीने फरक दिसून येतो. राजसी श्रध्दा असलेले मनुष्य शास्त्रविधीला अनुसरुन कर्म करतात. त्यांना फळ म्हणून स्वर्गादि लोक प्राप्त सुध्दा होतो पण कर्मामध्ये सकामता असल्या कारणाने पुण्य क्षीण झाल्यानंतर परत मृत्युलोकात यावे लागते."क्षीणे पुण्ये मर्त्यलोकं विशन्ति" {भ.गी.९/२१} तसेच तामसी श्रध्दा असलेले मनुष्य शास्त्रविहीत कर्मही करत नाहीत . मूढता आणि कामना या कारणाने त्यांची अधोगती होते. "अधो गच्छन्ति तामसा:" {भ.गी.१४/१८} याप्रमाणे राजसी व तामसी श्रध्दा धारण करणारे दोघेही बन्धनात पडतात.

सात्विकी श्रध्दा म्हणजे काय ? याला उत्तर देताना संत-महात्मे सांगतात की ,ज्याला आपण अनुभवाने जाणत नाही परन्तु पूर्वीच्या संस्कारातून , सन्त महात्म्यांचे विचार ऐकून त्यांच्या विषयी भावसहीत विश्वास ठेवणे (विश्वासो गुरुवाक्येषु) याला "सात्विकी श्रध्दा" असे म्हणतात. ही श्रध्दा घेवूनच मनूष्य अध्यात्म मार्गामध्ये प्रविष्ट होवू शकतो. मग तो मार्ग कर्मयोगाचा असेल , ज्ञानयोगाचा किंवा भक्तियोगाचा असेल.आपले 'साध्य' आणि 'साधन' या दोन्हीवर श्रध्दा नसेल तर आपल्या कार्यात यशस्वीता मिळणार नाही. म्हणून आपल्या कार्यावर "सात्विकी श्रध्दा" असावी.

मानवी जीवनामध्ये श्रध्देची अत्यन्त आवश्यकता आहे. जो मनुष्य आपल्या कल्याणाची इच्छा करतो त्याने अवश्य सात्विकी श्रध्देची जोपासना करावी. जेणेकरुन शास्त्रविधी न जाणताही (श्रध्देच्या जोरावर) केलेल्या कर्माचे फळ आपल्याला मिळेल.अशाप्रकारे श्रध्दायुक्त जीवन जगल्याने आपल्याला अध्यात्म मार्गातील अथवा कर्ममार्गातील पडणार्या प्रश्नांचे उत्तर नक्कीच सापडतील तसेच आपल्या इच्छित कार्यामध्ये यश मिळाल्याशिवाय राहणार नाही.

आपणा सर्वांना संस्कृतदिनाच्या खूप खूप शुभेच्छा हा संस्कृतदिन आपल्या आयुष्यात ज्ञानाचा प्रकाश घेवून येवो हीच भगवन्ताच्या चरणी प्रार्थना.

ISBN No: 978-81-94206-6-0

# संस्कृतसाहित्य परिचयः

आरती सदाशिव जोशी

एम.ए,-द्वितीय वर्ष

श्री नेताजी सुभाषचन्द्रबोस
महाविद्यालय
नांदेड.

संस्कृतम् , भारतस्य प्राचिना समृध्दा मूलभाषा वर्तते। देववाणी इति अभिधानेन एषा भाषा स्वप्राचिनतां दर्शयति इव। भारतस्य साहित्यिक,सांस्कृतिक, ऐतिहासिक,धार्मिक तथा अध्यात्मिक अपि च राजनितिक जीवनस्य सकला व्याख्या एव संस्कृतवाङ्मये सङ्कलिता अस्ति। वेदानाम् अतिरहस्यमय ज्ञानादारभ्य सामान्यजनानाम् मनोविनोदनार्थं लिखित 'पञ्चतन्त्र' कथा पर्यंन्तम् विपूला ज्ञानसम्पदा संस्कृतसाहित्ये सुरक्षिता अस्ति।एतदेव अस्माकं राष्ट्रस्य अमूल्यं सञ्चितम्।

इदम् संस्कृतवाङ्मयं द्विप्रकारकम् – वैदिकवाङ्मयं तथा लौकिकवाङ्मयम्।

## वैदिकवाङ्मयं

'विद्-ज्ञाने'इति धातोः जातस्य वेद शब्दस्य अर्थः 'ज्ञानस्य सङ्ग्रहः'। वैदिकवाङ्मयं पुरातनम्। तस्मिन् प्राचीनभारतस्य इतिहासः ,जीवनपद्धतिः,समाजव्यवस्था , संस्कृतिः तथा तत्वज्ञानम् एतत्सर्वं प्रतिबिम्बितं दृश्यते।

लेखनकलायाः उद्गमात् प्राक् मौखिकपरम्परया एतद् वाङ्मयं प्रचलितं संरक्षितं च। वैदिकवाङ्मयस्य चत्वारः विभागाः , संहिता , ब्राह्मणम् , आरण्यकं , तथा उपनिषद् इति।

१ **.संहिता** – संहिता नाम मन्त्रानाम् संग्रहः । संहिताः चतस्रः - ऋग्वेदः, यजुर्वेदः , सामवेदः तथा अथर्ववेदः इति।

अ. **ऋग्वेदः** - ऋचां वेदः ऋग्वेदः । ऋक् नाम छन्दबद्धाः रचना। ऋग्वेदे 10580 ऋचः सन्ति। नैकासाम् ऋचाम् समुच्चयः सूक्तम्। ऋग्वेदे 1028 सूक्तानि दशसु मण्डलेषु विभाजितानि । ऋषिभिः तथा एव ऋषिकाभिः विरचितेषु सूक्तेषु निसर्गशक्तयः स्तुताः। तत्र बहुनि सूक्तानि देवतास्तुतिपरानि सन्ति।

कानिचन् कथासूक्तानि , संवादसूक्तानि , तत्वज्ञानसूक्तानि अपि सन्ति। मण्डूकसूक्तं , पर्जन्यसूक्तं , अक्षसूक्तम् इत्यादीनि सूक्तानि रूचिरकाव्यरुपानि सन्ति। ऋग्वेदस्य केवलं ' शाकलं ' इति एका एव शाखा उपलभ्यते।

आ. **यजुर्वेदः -** ' यजुस्' नाम यज्ञविषयकाः गद्यमन्त्राः । तेषां संग्रहः यजुर्वेदः। यजुर्वेदस्य द्वे शाखे कृष्णयजुर्वेदः शुक्लयजुर्वेदः च । यजुर्वेदे यज्ञस्य महत्वं वर्णितम्। यज्ञः नामो कृतज्ञभावेन

ISBN No: 978-81-94206-6-0

देवतानां कृते अग्नौ आहुतिसमर्पणअम् । यज्ञस्य प्राकाराः , तेषु करणीयाः क्रियाः, तेषु पठनीयाः मन्त्राः एतत् सर्वं यजुर्वेदे कथितम्।

इ. **सामवेदः** - ऋग्वेदमंन्त्रस्य सङ्गीतमयं उच्चारणं नाम सामः। विभिन्नयागेषु उपयुज्यमानानाम् साम्नां समुच्चयः नाम सामवेदः । सर्वासु संहितासु सामवेदसंहिता लघुतमा। सामवेदस्य तिस्रः शाखाः उपलब्धाः । जैमिनीयशाखा , कौथुमशाखा तथा राणायनीय शाखा इति। भारतीयसङ्गीतस्य मूलस्रोतः सामवेदः।

ई. **अथर्ववेदः** - अथर्ववेदः सामान्यजनानां वेदः। जनाः ऐहिकजीवने विविधानां कामनानां पूर्तिम् इच्छन्ति। तत्कृते योजिताः मन्त्राः अथर्ववेदे सङ्कलिताः। आरोग्य-शान्ति-सामन्जस्य-समृद्धि-आदीनां प्राप्त्यर्थं अत्र सूक्तानि सन्ति। ' भैषज्यानि ' इतिआरोग्यविषयकसूक्तानां विभागः वर्तते। सः आयुर्वेदस्य मूलस्त्रोतः । विवाहः , कुटुम्बस्य सुखं , व्याधिनिवारणं , प्रायश्चित्तं , शत्रुविनाशः कृषिपशुपालनादीषु यशः राजधर्मः , यातुविधानं(Magic/जादूटोणा), तत्वज्ञानम् इति विभिन्नाः विषया अथर्ववेदे दृश्यन्ते। अथर्ववेदस्य द्वे शाखे – शौनकशाखा तथा पैप्पलादशाखा।तत्र विशतिकाण्डेषु ७३१सूक्तानि वर्तन्ते।

१. **ब्राह्मणग्रन्थाः** - ब्रह्म नाम यज्ञः वा पुरोहितः वा। पुरोहितैः यज्ञविषये याः चर्चाः कृताः ताः ब्राह्मणग्रन्थेषु सङ्गृहिताः । यज्ञेषु याः क्रियाः , ये मन्त्राः आवश्यकाः , तेषां स्पष्टिकरणं ब्राह्मणग्रन्थेषु वर्ततेः । ' ब्राह्मणग्रन्थाः नाम यज्ञस्य ज्ञानकोषः ' इति वक्तुं शक्यम्।

२. **आरण्यकम्** - अरण्येषु स्थितै तत्वचिन्तकैः यज्ञस्य तत्वार्थविषये यत् चिन्तनं कृतं , तत् सर्वं आरण्यकग्रन्थेषु सङ्कलितम्। एषु ग्रन्थेषु कर्म तथा ज्ञानम् एतेयोः संयोगः दृश्यते। सृष्टिनिर्मितिः , प्राणविद्या , ओङ्कारसाधना इत्यादयः विषयाः अत्र चर्चिताः।

३. **उपनिषद्** - ' उपनिषद् ' ( उप+नि+सद्) इति शब्दस्य अर्थः समीपे उपवेशनम्। शिष्येण गुरोः समीपं गत्वा यद् गुह्यं प्राप्तव्यं , तद् उपनिषत्सु सङ्गृहितम् । यज्ञीयकर्मकाण्डात् परं गत्वा सृष्टेः मूलतत्वम् अवगन्तुं कृताः प्रयासाः अत्र दृश्यन्ते। सृष्टिः कथम् उत्पन्ना , सृष्टेः कार्यं कथं प्रचलति , सृष्टौ मनुष्यस्य कीदृशं स्थानं , जन्ममृत्यू कीदृशौ , मृत्योः अनन्तरं मनुष्यस्य का गतिः इत्यादीनां प्रश्नानाम् उत्तराणि अन्वेष्टुं कृताः प्रयत्ना अत्र दृश्यन्ते। ' एकः एव आत्मा सर्वेषु भूतेषु वर्तते ' इति उपनिषदः उपदिशन्ति। उपनिषद् नाम भारतीयतत्वज्ञानस्य मूलं ' वेदान्तः ' इति नाम्ना अपि प्रसिद्धम्। प्रमुखाः दश उपनिषदः सन्ति –

**इश-केन –कठ-प्रश्न-मुण्ड-माण्डूक्य-तित्तिरः।**
**छान्दोग्यम् ऐतरेयं च बृहदारण्यकं तथा॥**

ब्राह्मणं कर्मकाण्डम् इति स्मृतम् , आरण्यकम् उपासनाकाण्डं तथा उपनिषद् ज्ञानकाण्डम् इति प्रसिद्धम्।

४. **वेदाङ्गानि -** वेदवाङ्मयस्य षड् अङ्गानि नाम वेदाङ्गानि । वेदानां सम्पूर्णज्ञानार्थं रचितानि एतानि।तद्विषयकं प्रसिद्धं सुभाषितम् –

**छन्दःपादौ तु वेदस्य हस्तौ कल्पान् प्रचक्षते।**

ISBN No: 978-81-94206-6-0

**ज्योतिषं चक्षुर्वेदस्य निरुक्तं श्रोत्रमुच्यते॥**
**शिक्षा घ्राणं तु वेदस्य मुखं व्याकरणं स्मृतम्।**
**तस्मात् साङ्गमधीत्यैव ब्रह्मलोके महीयते॥**

अ. **शिक्षा** - शिज्ञा नाम उच्चारणशास्त्रम् । स्वरवर्णादिकानां यथायोग्यम् उच्चारणं यत्र शिक्ष्यते उपदिश्यते सा शिक्षा । उच्चारणविषये वैज्ञानिकी विचारपद्धति: अत्र दृश्यते। नारदीयशिक्षा , पाणिनीयशिक्षा इत्यादय: शिक्षाग्रन्था: प्रसिद्धा:।

**आ . कल्प:** - कल्प: नाम विधि: , कर्म अथवा नियम: । कल्पस्य चत्वार: विभागा: तथा

तेषां मुख्य विषया: ईदृशा: -

श्रौत्रसूत्रम् = वेदेषु प्रसिद्धा: यज्ञयागा:

गृह्यसूत्रम् = संस्कारा: /पन्च महायज्ञा:

धर्मसूत्रम् = सामाजीकव्यवहार: , नीतिशास्त्रम् , राज्यव्यवस्था

शुल्बसूत्रम् = भूमितिशास्त्रम् , गणितशास्त्रम्

३. **निरुक्तम्** - निरुक्तं नाम व्युत्पत्तिशास्त्रम्। तद् यास्काचार्येण विरचितम्। वैदिकशब्दानाम् व्युत्पत्तय: यदा अवगम्यते तदा तेषां अर्थ: सुलभतया 5आयते वैदिकशब्दानाम् सङ्ग्रह: ' निघण्टु ' इति नाम्नि शब्दकोषे वर्तते। तेषां श्ब्दानां स्पष्टीकरणं निरुक्तग्रन्थे प्राप्यते।

उदा. प्रथनात् पृथिवी ..............।

४. **व्याकरणम्** - येन शब्द: व्याक्रियते तद् व्याकरणम्। वर्णपरिचय: , शब्दानां रूपसिद्धि: , वाक्यसंरचना इत्यादय: अत्र प्रमुखा: विषया: अष्टाध्यायी इति व्याकरणस्य परिपूर्ण: ग्रन्थ: . पाणिनी: तस्य रचयिता।

५**. छन्द:** - वेद: नाम छन्दोमयी वाणी इति उच्यते। वैदिकपद्ये मन्त्रा: विविधच्छन्दस्सु रचिता: , तद् विषयकं शास्त्रं छन्द:शास्त्रम्। पिङ्गलाचार्य: तस्य रचयिता ।

६**. ज्योतिषम्** - ज्योति: नाम आकाशस्था: तारका। तद् विषयकं एतद् शास्त्रं खगोलशास्त्रं इति प्रसिद्धम्। ग्रहाणां स्थानानि , ग्रहणम् , पृथिव्या: परिभ्रमणम् , कालज्ञानं , ग्रहतारकाणां स्थिति: ,एते तस्य प्रमुखविषया: । लगधाचार्य: तस्य रचयिता।

ISBN No: 978-81-94206-6-0

# पुराणानि

' पुरा अपि नवं भवति ' नाम प्राचीनं भूत्वा अपि नित्य नुतनं भासते तद् पुराणम्। पुराणानि सामान्यजनान् प्रति वेदानां सारं वर्णयन्ति। सुर्हद्वत् उपदिशन्ति। सृष्टिनिर्मितिः , सृष्टिविनाशः , प्राचीनानि आख्यानानि , उपदेशपरानि वर्णनानि , नृपाणाम् वंशावलिः , कालपरिगणना एते पुराणानां प्रमुखविषयाः। कथारुपेण भक्तिमार्गस्य उपदेशः अत्र दृश्यते । पुराणानां रचयिताव्यासः इति परम्परा कथयति। अष्टादश प्रमुखानि पुराणानि सन्ति –

**म-द्वयं –भ-द्वयं-चैव ब्र-त्रयं व –चतुष्टयम्।**

**अ-ना- प-लिं- ग- कू- स्कानि पुराणानि प्रचक्ष्यते॥**

**म-द्वयम् –**मत्स्यपुराणम् , मार्कण्डेयपुराणम्

**भ-**द्वयम् – भविष्यपुराणम् , भागवतपुराणम्

**ब्र-**त्रयम्- ब्रह्मपुराणम् , ब्रह्मवैवर्त्यपुराणम् , ब्रह्माण्डपुराणम्

**व-**चतुष्टयम् - वराहपुराणम् , वामनपुराणम् , वायूपुराणम् , विष्णूपुराणम्

**अ-**अग्निपुराणम्

**ना –** नारदपुराणम्

**प –** पद्मपुराणम्

**लि –** लिङ्गपुराणम्

**ग –** गरुडपुराणम्

**कू –** कूर्मपुराणम्

**स्क-** स्कन्दपुराणम्

ISBN No: 978-81-94206-6-0

# आर्षमहाकाव्ये

ऋषिणा रचितं महाकाव्यं नाम आर्षमहाव्यम्। ते द्वे- रामायणम् महाभारतम् च। रामायणस्य कर्ता आदिकवि: वाल्मीकि: । रामायणं नाम रामस्य अयनं , जीवनक्रम:। तत्र सप्त-काण्डानि , तेषु २४००० पद्यानि सन्ति।

भरतवंशीया: राजान: यत् परस्परं अयुध्यन्त, तस्य युद्धस्य नहती गाथा नाम महाभारतम् । महर्षि: व्यास: तस्य रचयिता। अयं ग्रन्थ: पूर्वं जय: नाम इतिहास: इति प्रसिद्ध: आसीत्। तत्र अष्टादश पर्वाणि सन्ति। तेषु एकलक्षश्लोका: वर्तन्ते। महाभारते एव भीष्मपर्वणि भगवद्गीता विद्यते।

न केवलं भारते अपि तु भारतात् बहि: अपि अद्य अपि एते आर्षमहाकाव्ये प्रसिद्धे।

# लौकिकसाहित्यम्

लौकिकसाहित्यं द्विप्रकारकम् – श्रव्यसाहित्यं तथा दृक्श्रव्यसाहित्यम्। दृक्श्रव्यं साहित्यं नाम नाटकम् ।




**गद्यसाहित्यम् -** गद्यलेखनं नाम कवीनां निकषम् इति उच्यते। गद्यकाव्यस्य आख्यायिका कथाच इति विभागद्वयम्।

कथा तु कविकल्पनाधारिता। अस्य मूलं वैदिकसाहित्ये एव वर्तते ।




ISBN No: 978-81-94206-6-0

**पद्यवाङ्मयम्** -

पद्यं नाम गेयतायुक्तं वृत्तबद्धं काव्यम्। पद्यकाव्यस्य बहुप्रकारा: सन्ति।




**चम्पूकाव्यम्** - 'गद्यपद्यमयं काव्यं चम्पू: । तत्र पद्यस्य अपेक्षया गद्यस्य प्राधान्यं वर्तते । ख्रिस्ताब्दस्य दशमशतकानन्तरं रचितानि चम्पूकाव्यानि उपलब्धानि । तेषु भोजस्य रामायणचम्पू: अनन्तभट्टस्य भारतचम्पू: , नलचम्पू: इत्यादीनि चम्पूकाव्यानि प्रसिद्धानि।

-----------------------------------------------------------------------------------------------

ISBN No: 978-81-94206-6-0

# मध्यमव्यायोग नाटकातील हिडिंबा – मानवी राक्षसी

प्रा. डॉ. मीनाक्षी सुभाष भांदककर
स्व. मदनगोपाल मुंधडा कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय,
चांदूर रेल्वे, जि. अमरावती
दूरभाष क्र. ९५११७९३९४६
ईमेल – bhandakkarms@gmail.com

संस्कृत नाटककारांच्या परंपरेत महाकवी भास हा पहिला नाटककार मानल्या जातो. त्याच्या काव्याचा समाजमनावर इतका जबरदस्त पगडा होता की, महाकवी कालिदासालाही आपले प्रथम नाट्य 'मालविकाग्निमित्रम्' रसिकांसमोर सादर करताना बुजरेपणा वाटला. म्हणूनच त्याने या नाटकाच्या प्रस्तावनेमध्येच या श्रेष्ठ नाटककाराचा उल्लेख करून आपल्या नाटकास प्रारंभ केलेला आढळून येतो.[१] भासकवीने एकूण १३ रूपकांची निर्मिती केलेली आहे. म्हणूनच 'सर्वात जास्त नाट्यकृतींचा जनक' याच शब्दांत त्याची प्रशंसा केली जाते. महाभारत, रामायण आणि लोककथांवर आधारित त्याची ही सर्व नाटके अत्यंत रोचक आणि मनोवेधक आहेत. भासकवीचे नाट्यनिर्मितीचे वैशिष्ट्य असे की, त्याने दुर्योधनकैकयीसारख्या दुष्ट पात्रांचे उदात्तीकरण करून या पात्रांकडे बघण्याची आणि इतिहासाला पुनश्च एकदा समजून घेण्याची नवदृष्टी समाजाला दिलेली दिसून येते. दुसरे असे की, या कवीने रामायणमहाभारतासारख्या ऐतिहासिक घटनांमध्ये परिवर्तन करून स्वत:च्या कल्पनाविलासाचे दर्शनही घडविलेले दिसून येते.

महाकवी भासाचे 'मध्यमव्यायोग' या नाटकात घटोत्कच आणि हिडिंबेसारखे राक्षसी पात्र असले तरीही त्यांच्या वागण्याबोलण्यात राक्षसी पाशवीपणा दिसून येत नाही. या संपूर्ण नाटकात हिडिंबा हे पात्र विशेषत: सामाजिकांच्या मनावर अधिराज्य गाजविताना दिसते. कोण आहे ही हिडिंबा? हिडिंबा ही राक्षसी जातीची स्त्री असून ती भीमाची पहिली पत्नी होती. महाभारतातील वनपर्वामध्ये 'भीम–हिडिंबा' कथानक आहे. भीमसंसर्गातून तिला घटोत्कच नावाचा पुत्र झाला. गर्भसंभवापर्यंतच भीमाचा सहवास लाभलेल्या या राक्षसीने आपल्या पुत्राचे लालनपालन करीत संन्यस्त जीवन स्वीकारले ते शेवटपर्यंत. हिडिंबा ही राक्षसजातीची असली तरी राक्षसवृत्तीची नव्हती. तामसी गुणांवर पाय ठेवून सात्त्विकतेचा स्वीकार करणारी ती खरी सती होती.

भासकवीने मध्यमव्यायोग या व्यायोगनामक रूपकप्रकारात तिचे अल्पसे दर्शन घडविले असले तरी, तिच्या सात्त्विक स्वभावाची पडछाया घटोत्कचाच्या आचरणातून जाणवते. केवळ मातेच्या पदराखाली वाढलेला घटोत्कच हा सुसंस्कारित तरुण आहे. 'शुद्ध बीजापोटी फळे रसाळ गोमटी' या तुकारामांच्या अभंगाचे मर्म हिडिंबा–घटोत्कच या मातापुत्रामध्ये जाणवते. घटोत्कच राक्षसीपुत्र असूनही त्याचे आचारविचार हे माणुसकीने युक्त आहे. तो जरी भीमाचा मुलगा असला तरी त्याचे संवर्धन आणि संगोपन हे तो जन्मल्यापासून हिडिंबेनेच केलेले आहे. त्यामुळे

ISBN No: 978-81-94206-6-0

हिडिंबेच्या आचारविचारांचे प्रतिबिंब स्वाभाविकपणे तिच्या मुलामध्ये पडलेले दिसून येते. जर हिडिंबा ही राक्षसीवृत्तीची असती तर तिचा पुत्रही तसाच झाला असता.

हिडिंबा ही विनयशील आणि जागरूक स्त्री आहे. अरण्यवासातील एकाकी जीवनात तिने आपल्या पुत्राला सर्वगुणसंपन्न बनविले. तो युद्धकुशलही आहे. पराक्रमी आहे. विनम्र, मातृभक्त आणि ब्राह्मणांचा आदर करणारा आहे. हे सर्व शिक्षण त्याने कुठे घेतले असावे? तो कोणत्या गुरुकुलात गेला असेल? संयुक्त कुटुंबपद्धती किंवा वाडवडिलांचा वारसा प्राप्त झाल्याने तो वडिलधाऱ्यांशी प्रेमाने वागून त्यांचा आदर करायला शिकला असेल का ? नाही. तर हे सर्व ज्ञान त्याने आत्मसात केले ते केवळ आपल्या एकट्या आईच्या सहवासात राहूनच. भीमाला मायापाशात बद्ध करताना तो स्वत:च म्हणतो, ‘‘अस्ति मातृप्रसादलब्धो मायापाश:।’’[२]

हिडिंबा ही अत्यंत चाणाक्ष स्त्री आहे. प्रसंगावधानकौशल्य तिच्या ठायी आहे. घटोत्कचाने भीमाला आईच्या उपवासाचे पारणे फेडण्यासाठी पकडून आणले तेव्हा भीम तिला विचारतो, ‘‘हिडिंबे, किमिदम् ?’’[३] तेव्हा ती त्याच्या कानात उत्तर सांगते. तेव्हा भीम तिची प्रशंसा करताना म्हणतो, ‘‘जात्या राक्षसी न समुदाचारेण’’[४] काय सांगितले असावे तिने बहुप्रतीक्षित पतीच्या कानात? ज्यावेळी तिला वनवासात असलेल्या पांडवांच्या आगमनाची बातमी मिळाली असेल. कदाचित तेव्हा पतिमीलनाची इच्छा, पितृपुत्रमेलनाची आकांक्षा तिच्या मनात बळावली असेल. म्हणून तिने ही क्लृप्ती योजली असावी. पांडव हे शरणागतवत्सल आणि जनरक्षक असल्यामुळे ते अरण्यात घटोत्कचाकडून पीडलेल्या मनुष्यांचे रक्षण नक्कीच करतील अशी तिला पांडवांविषयी खात्री असावी. म्हणूनच तिने आपल्या बलदंड आणि पराक्रमी पुत्राला आहारासाठी मनुष्य आणण्याची आज्ञा केली असावी. अशी ही चाणाक्ष, योजनाचातुरी राक्षसी ‘पतिस्नेह: अतिबलवान्।’ मानणारी पतिव्रता मानवी स्त्रीच आहे.[५] पुत्र घटोत्कचाच्या मनात तिने दृढ पितृभक्ती रुजवलेली दिसून येते. भीमाचा पराक्रम आणि बाहुबल त्याच्या ऐकिवात आहे. कारण भीमाशी द्वन्द्वयुद्धात तो स्वत:च्या बाहुबलाचे वर्णन करतो. तेव्हा घटोत्कच म्हणतो, ‘असे कथन केवळ माझे पिता भीमसेनच करू शकतात. भीम त्याला गमतीने विचारतो, ‘ब्रह्मा, विष्णू, इंद्र, कार्तिकेय यमराज आणि महेश या सर्वांमध्ये तुझा पिता कोणासारखा आहे?’’ तेव्हा तो अत्युत्साहाने आणि आत्मविश्वासाने उत्तर देतो की, ‘‘या सर्वांसारखेच आहेत माझे पिता’’.[६] कधीही न पाहिलेल्या पित्याचा घटोत्कचाला एवढा सार्थ अभिमान आणि आदर कसा बरे वाटत असावा? ही सर्व त्याच्या आईची म्हणजे हिडिंबेचीच किमया नाही काय?घटोत्कच हा बालपणापासून केवळ आईच्याच छत्रछायेखाली वाढलेलं पोर आहे. तो आईकडूनच सर्वप्रकारच्या विद्या शिकला. किंबहुना युद्धातील मायापाशाची विद्याही तिनेच त्याला शिकविली असे तो भीमाला सांगतो.

ISBN No: 978-81-94206-6-0

अशी ही दानवकुलोत्पन्ना हिडिंबा, भीमाची प्रेयसी आणि पत्नी, हस्तिनापुरच्या राजवंशाची स्नुषा आपल्या अत्यल्प दर्शनातून स्वत:चा अमीट ठसा उमटवून जाते. इतका की, लोक तिची पूजा करू लागतात. तिच्या नावाने मंदिरही बांधतात. हिडिंबा.... आणि मंदिर? भारतात एका राक्षसीचेही मंदिर असू शकते? थोडे चमत्कारिकच वाटते ना? हिमाचलातील कुलू–मनालीमध्ये देवी हिडिंबेचे मंदिर आहे. हिडिंबा राक्षसीला हिमाचलात देवी म्हणतात. 'देवी हिडिंबा मंदिर' या नावाने प्रसिद्ध असलेल्या हिडिंबेच्या या मंदिराची निर्मिती सहाशे वर्षांपूर्वी कुलू राजाने केली. येथे लोक तिची पूजा करतात. उत्सव करतात नि नवसही बोलतात.[७]

भासकवीने हिडिंबेचे उदात्त आणि उज्ज्वल व्यक्तिचित्रण रेखाटण्यासाठी तसेच तिला स्त्री म्हणून न्याय मिळवून देण्यासाठीच 'मध्यमव्यायोग' या रूपकाची निर्मिती केली असे म्हटल्यास प्रत्यवाय होणार नाही.

**संदर्भसूची**

१. प्रथितयशसां भासकविपुत्रसौमिल्लकादीनां प्रबन्धानतिक्रम्य वर्तमानकवे: कालिदासस्य क्रियायां कथं परिषदो बहुमान:? मालविकाग्निमित्रम्, अंक १, पृ. क्र. २

२. मध्यमव्यायोग, पृ. क्र. ४०

३. मध्यमव्यायोग, पृ. क्र. ४४

४. मध्यमव्यायोग, पृ. क्र. ३५

५. मध्यमव्यायोग, पृ. क्र. ४०

६. मध्यमव्यायोग, पृ. क्र. ४२

७. महाभारतातील व्यक्तिरेखा, डॉ. विमल पवनीकर, पृ. क्र. ३९७)

**संदर्भग्रंथ**

१. मध्यमव्यायोग:, महाकवी भास, संपा. रामजी मिश्र, चौखंबा सुरभारती प्रकाशन, वाराणशी १९८५

२. महाभारतातील व्यक्तिरेखा, डॉ. विमल पवनीकर, विजय प्रकाशन, नागपूर, प्रथमावृत्ती, १६ जून २००५

ISBN No: 978-81-94206-6-0

# मुल्याधिष्ठित शिक्षण काळाची गरज

देशपांडे दत्तात्रेय दुर्गादास
M.A.2year
N.S.B.College.Nanded.

**वसुधैव कुटुंबकम्।**

वरील पंक्ती भारतीय मूल्य परंपरेमध्ये संस्कृत साहित्याने दिलेली देणगी आहे. वरील पंक्तीचा अर्थ असा होतो की, "वसुधा एक कुटुंबच" अर्थातच हे सारे विश्व एका कुटुंबाप्रमाणे होय . ज्यावेळी जगात औद्योगिक क्रांती घडलीही नव्हती, त्या समयाच्या अनेक वर्ष आधीपासूनच भारतीय लोक समस्त विश्वाच्या कल्याणाचा विचार करत होती. हे वरील उक्तीतून दिसून येते. याच मूल्यावर आधारित असलेली मराठी भाषेतील

**हे विश्वची माझे घर !!**

ही म्हण अस्तित्वात आहे.

अर्थातच त्यावेळी समस्त भारतीय मनुष्य समाज हा स्वयंपूर्ण व परिपूर्ण जीवन जगत होता. आणि त्याला कारण म्हणजे **"मूल्याधिष्ठित शिक्षण"** होय.

मग प्रश्न हा निर्माण होतो की मूल्याधिष्ठित शिक्षण म्हणजे काय? शब्दोत्पत्ती, निर्वचन, यानुसार मूल्यशिक्षण या शब्दाच्या अनेक व्याख्या होतील , पण सोप्या शब्दात सांगावयाचे झाल्यास परोपकार, ममता, नम्रता, आदर, दया इ. मानवतेच्या गुणांनी युक्त असलेले शिक्षण म्हणजेच **"मूल्याधिष्ठित शिक्षण"** होय.

सद्य परिस्थितीमध्ये मूल्याधिष्ठित शिक्षणाचा प्रचार आणि प्रसार होणे अत्यंत महत्वाचे आहे.

कारण आजची सामाजिक स्थिती जाणून घेतली असता, आपल्याला सहज लक्षात येईल की, आज आपल्या समाजाला मूल्याधिष्ठित शिक्षणाची किती गरज आहे!!

उदा. एखाद्या वेळी एखाद्या व्यक्तीचा अपघात झाला, तर उपस्थित असलेल्या लोकांचे वर्तन काय आहे,हे पाहिले असता आपल्याला सहज लक्षात येईल की, काही लोक लगेच खिशात हात घालतात कारण त्यांना त्या घटनेचे फोटो आणि व्हिडिओ सोशल मीडियावर टाकायचे असतात. ना की त्या व्यक्तीस मदत करावयाची असते.

पूर्वी जी संस्कृती, जो देश, समस्त विश्वाच्या कल्याणाचा विचार करत होता; त्याच देशात आज ही परिस्थिती उद्भवणे खेददायक आहे.

यास कारणीभूत ठरणारी अनेक कारणे आहेत. त्यातील प्रमुख कारण म्हणजे शिक्षण पद्धती होय सद्यस्थितीत भारतातील शिक्षण पद्धती ही भारतीय परंपरेचीही नाही आणि पाश्चात्य पद्धतीची ही नाही. ही तर केवळ आणि केवळ पाश्चात्य शिक्षण पद्धतीचे अनुकरण करणारी आहे .

(मतितार्थ हा की यात पाश्चात्य पद्धतीचे गुण नाहीत पण दोष आहेत).

पाश्चात्यदेशांमध्ये शिक्षकाला मुलांच्या मनाला पैलू पाडणारा कारागीर म्हणून खूप मोठा मान व आदर मिळतो, पण तो आदर भारतात अपेक्षित प्रमाणात मिळत नाही .

खेद हा की , उलट शिक्षकास अनादराचा सामना करावा. अर्थातच यात विदेशी पद्धतीचे गुण नाहीत पण दोष आहेत. विदेशात आजही अनेक शाळा-कॉलेज आहेत, ज्याची सफाई विद्यार्थी करतात.

शाळा आणि कॉलेज याकडे पाहण्याचा दृष्टिकोन हा मंदिराप्रमाणे पवित्र असतो खरोखर ते विद्यामंदिर याच दृष्टीने शाळेकडे पाहतात.

पण ही परिस्थिती भारतात अत्यंत दुर्मिळपणे पाहावयास मिळते .

ISBN No: 978-81-94206-6-0

या उलट आमच्या भारतातील विद्यार्थी महाविद्यालयांची स्वच्छता करावयाचे सोडून,स्वच्छतेकडे कानाडोळा करून, जेथे धूम्रपानाची बंदी असते अशा ठिकाणी, म्हणजेच शाळेतच,

**"येथे थुंकू नये"**

असे लिहिलेले असते, त्याच ठिकाणी थुंकताना दिसतात. या परिस्थितीवरून असे वाटते की आपल्याला आता खरी मूल्याधिष्ठित शिक्षणाची गरज आहे. नव्हे नव्हे तर मूल्याधिष्ठित शिक्षणाशिवाय गत्यंतर नाही असे म्हटले तरीही चुकीचे ठरणार नाही. आपल्याकडे काही गोष्टी जशा ठासून ठासून शिकवल्या जातात त्याच प्रमाणात मूल्यशिक्षण शिकवल्या जात नाही.

2+2=4 हे लहानपणी शिकलेले, आपण आयुष्याच्या उत्तरकालातही2+2=4 हेच सांगतो. साडेतीन हि मान्य करत नाहीत. याच सोबत गांधीजींनी पुरस्कृत केलेली स्वच्छता ही शिकतो ,पण वर्गाच्या बाहेर आल्याबरोबर ती विसरून जातो. याचे कारण म्हणजे,ज्या वेळी हे ज्ञान आपण घेत असतो , हा विषय आपण शिकत असतो, त्यावेळी त्याच वर्गात जाळे जळमटे दिसतात,. एखाद्यावेळी शेवटचा बाक हि धुळीमध्ये खितपत पडलेला दिसतो, आणि ह्या स्वच्छतेच्या विषयातही प् प्रात्यक्षिक किंवा वास्तविकता नसते. सांगण्याचे तात्पर्य हेच की मूल्याधिष्ठित असलेले विषयही आपण अनुभवाच्या (प्रात्यक्षिकांच्या) माध्यमातून शिकत नाहीत तर तेही फळ्यावर शिकतो किंवा शिकवतो. हा आपल्या शिक्षणपद्धतीचा दोष आहे. याच बरोबर आपल्या शिक्षण पद्धतीचा सर्वात मोठा दोष म्हणजे;

माणूस जसा-जसा शिकत जातो, तसा-तसा तो स्वयंपोषी बनतो, किंवा स्वतः पुरता मर्यादित विचार करणारा होतो, व आत्मकेंद्री बनत जातो हे आपल्याला प्रत्यक्षात पहावयास मिळते.

जी व्यक्ती निरक्षर असते किंवा ज्या व्यक्तीने शिक्षण घेतलेले नसते, ती व्यक्ती मात्र गणित, इंग्रजी, विज्ञान, येत नसले तरीही लोकव्यवहार व व्यक्ती-व्यक्तित्वसंबंधातून मूल्याधिष्ठित शिक्षण आपोआपच ग्रहण करते.

वरील विषयासंदर्भात विचार केला असता, ही परिस्थिती उद्भवल्यास नेमके कारण काय हा प्रश्न मनात डोकावल्या शिवाय राहत नाही.

यास कारण म्हणजे, "लॉर्ड मेकॉले" होय. आणि याचा प्रत्यक्ष पुरावा ही खुद्द लॉर्ड मेकॉलेच होय.

लॉर्ड मेकॉले आपल्या इ.स.1834ते1838 दरम्यान आपल्या भारतातील निरीक्षणानंतर इंग्लंडच्या पार्लमेंटला उद्देशून म्हणतो की,

**"भारतावर राज्य करावयाचे असेल, तर त्यांची शिक्षण पद्धती बदलावी लागेल अन्यथा भारतावर जास्त काळ राज्य करणे कठीण आहे."**

मेकॉलेच्या या स्टेटमेंटचा विचार करून इंग्लंडच्या पार्लमेंटने भारतातील शिक्षण पद्धतीमध्ये बदल केले.

याच प्रसंगाचा उल्लेख करताना परमपूज्य वरदानंद भारती (आप्पा) हे आपल्या राष्ट्र संरक्षक पोवाड्यात असे म्हणतात की,

***मेकॉलेने बुद्धिपुरस्सर शिक्षण जे आम्हास दिले ॥ तेणे मेली*** **बुद्धी आमची खरे असे ते तिज न कळे ॥**

वरील प्रसंगातून आपल्याला हे दिसून येते की, तत्पूर्व भारतातील शिक्षण पद्धतीमुळे इंग्रजांना जास्त काळ भारतावर राज्य करणे शक्य नव्हते, म्हणून त्यांनी शिक्षण क्षेत्रामध्ये बदल केले.

पूर्व भारतातील शिक्षण पद्धती ही अत्यंत उच्च दर्जाची होती व तिचा इंग्रजांवर प्रचंड दबदबा होता असेच यावरून आपल्याला दिसते.

मेकॉलेच्या पूर्वी भारतामध्ये कोणती शिक्षण पद्धती होती व त्या शिक्षण पद्धती मार्फत मूल्याधिष्ठित शिक्षण दिले जात होते का? हे पाहणे गरजेचे ठरते. पूर्वी भारतामध्ये महान गुरुकुल पद्धती होती.

ISBN No: 978-81-94206-6-0

या पद्धतीमध्ये वयाच्या पाच ते आठव्या वर्षापासून शिक्षणाला आरंभ होत असे.

विशेष वैशिष्ट्य म्हणजे विद्यार्थी पूर्णवेळ गुरूंच्या सान्निध्यात राहून व स्वगृहाचा त्याग करून शिक्षण घेत असत. अशाप्रकारे चालणारे शिक्षण कार्य वयाच्या 21 किंवा 22 व्या वर्षांपर्यंत पूर्ण होत असे.

या शिक्षणात त्यांना वेदवेदांगासहित वैदिक गणित, तर्कशास्त्र, खगोलशास्त्र, इत्यादी 18 विषयांचे शिक्षण दिल्या जात असे. या पद्धतीचे वैशिष्ट्य असे की, एक विषय संपल्यावर दुसरा विषय शिकवल्या जात असत. विद्यार्थ्यांच्या परीक्षा ह्या रूममध्ये बसून तीन तासाचा पेपर, अशा पद्धतीच्या नव्हत्या, तर विषयाला अनुसरून विद्यार्थ्यांना काही कामे दिली जात असत व त्यातून तो खरे किती बोलतो, प्रामाणिक किती राहतो, इ. ज्ञानासोबतच मूल्येही तपासले जात असत. विद्यार्थ्यांमध्ये मूल्ये रुजवित असताना गुरुजी दिनचर्येतील लहानातील लहान (गोष्टींचा) क्रियेचाही उपयोग करून घेत असत.

उदा; अभ्यासाला बसण्यापूर्वी गुरूंना नमस्कार करणे, जेवणाच्या पूर्वी अन्नाची स्तुती करणे,

ई. जेणेकरून त्या गोष्टींचा आदर विद्यार्थ्यांमध्ये टिकून राहील.

म्हणजेच दिनचर्येच्या माध्यमातून नम्रतेने वागणे, सत्य बोलणे, श्रेष्ठांचा आदर करणे, स्वावलंबी होणे, गरज असेल तेथे मदत करणे हे विद्यार्थ्यांच्या मनावर आपोआपच बिंबवल्या जात असे.

यासाठी संस्कृतमधील सुभाषितांच्या माध्यमातून बरीच मदत होते हे आजही सिद्धच आहे.

**सत्यं वद । धर्मं चर । अतिथी देवो भव । मातृदेवो भव । वसुधैव कुटुंबकम् ।अन्नं ब्रह्मेति व्यजानात्।मोघमन्नं विन्दते अप्रचेताः । संगछध्वं संवदध्वं ।**

अशा अनेक सुभाषितोक्तिंमधून व विविध क्रियांमधून विद्यार्थ्यांवर नैतिक मुल्ययुक्त संस्कार केले जात असत. म्हणूनच सुभाषितांना वृद्ध चाणक्याने रत्न अशी संज्ञा दिली आहे.

या सुभाषितांच्या माध्यमातून , दिनचर्येच्या माध्यमातून, व इतर माध्यमाद्वारे विद्यार्थ्यांवर मूल्ययुक्त संस्कार केले जात असत. म्हणूनच पूर्वीचा भारत सुखी व समृद्ध होता. पूर्वीच्या स्थितीचे वर्णन करताना लॉर्ड मेकॉले म्हणतो की,

**"मी निरीक्षण करत असताना भारतामध्ये कुठेही भिकारी पाहिला नाही" !** याचाच अर्थ बेरोजगारीचे प्रमाणही शुन्य होते हे फक्त आणि फक्त गुरुकुल पद्धतीमुळेच शक्य होते कारण, सर्वात जास्त मूल्याधिष्ठित शिक्षणाची व्यवस्था गुरुकुल पद्धतीमध्येच होती आणि हे प्रो.धर्मपाल यांनी पुराव्यानिशी सिद्ध केले आहे. धर्मपाल यांनी वीस वर्षांपेक्षाही जास्त काळ इंग्लंड, फ्रान्स आदी देशांमध्ये वास्तव्य करून,कठोर परिश्रमपूर्वक संशोधन करून दस्तऐवज जमा करून ठेवले आहेत.

त्यांच्या अभ्यासाअंती आलेल्या मतानुसार आपण गुरुकुल पद्धतीचा स्वीकार करावयास हवा.

पण परिस्थितीनुसार किंवा कालानुसार आपल्याला आजच्या शिक्षण पद्धतीला संपूर्णपणे डावलून गुरुकुल पद्धतीचा स्वीकार करणे शक्य नसेल तर ,गुरुकुल पद्धतीतील स्विकारणीय तत्वांचा स्वीकार करावयास हरकत नाही .

कारण, मूल्याधिष्ठित शिक्षण ही आज काळाची गरज बनली आहे.

काय माहित पुढे आपल्याला मूल्याधिष्ठित शिक्षण देण्याची संधी मिळेल अथवा न मिळेल ,

कारण;

**आज आपल्याला संधी मिळते आहे मूल्ये रुजविण्याची ॥**

आणि

**गर्दीत माणसांचा माणूस शोधण्याची ॥**

. **गर्दीत माणसांचा माणूस शोधण्याची ॥**

ISBN No: 978-81-94206-6-0

# प्राणायाम

योगेश कुलकर्णी
एम.ए.संस्कृत व्दितीय वर्ष,
नेताजी सुभाषचंद्र बोस महाविद्यालय, नांदेड.

आज आपण चिंतन करणार आहोत प्राणायाम विषयी प्राणायाम सर्वांना माहीत आहे. श्वास घेणे ,श्वास रोखणे ,श्वास सोडणे परंतु विधान माहीत नाही, क्रम माहीत नाही , आपल्याला जे काही येतं त्याच विधियुक्त ज्ञान असणे आवश्यक आहे. श्वास घेणे याला पुरक म्हणतात , श्वास अडवणे याला कुंभक म्हणतात ,श्वासाला सोडणे रेचक म्हटलं जात. यात आणखीन काही प्रकार आहेत. संध्या वंदन मधे ही प्राणायाम आहे त्याविषयी आज आपण थोडक्यात अभ्यासू, तो प्राणायाम करतान्हा मंत्रापुरस्सरण होणे अत्यंत आवश्यक आहे. आणि मंत्रपुरस्सरन कश्यामुळे आवश्यक आहे हे पाहणे ही तितकेच आवश्यक आहे .विष्णु धर्मोत्तर पुराण आपणास सांगत प्रणव आणि व्याहृति मंत्र गायत्री शिरसा सह प्राणायाम आपण केला पाहिजे.

सव्याहृतिं सप्रणवं गायत्रीं शिरसा सह त्री: पठेत् आयातः प्राणः प्राणायामः सउच्चते ।

प्राणायाम म्हणजे काय?

प्राणानाम् +आयामः।

आपल्या जीवनासाठी जे अत्यंत आवश्यक आहे अश्या त्या प्राणायामाला श्वासोच्छ्वास आवश्यक आहे. आपल्या शरीरात कायम रक्ताभिसारण चालू असते ,कारण संपूर्ण शरीरात योग्य प्रमानात रक्ता द्वारे ऑक्सीजन आवश्यक आहे ,ज्या भागात रक्ताद्वारे ऑक्सीजन चे प्रमाण कमी होते अथवा मिळत नाही तो भाग मृत होतो . यावरून आपणास कळते की ऑक्सीजन ची शरीरासाठी खूप आवश्यकता आहे. परंतु आजकालच्या जीवनपद्धीती मुळे रात्री जागणे ,दिवसभर झोपणे आणि उपयुक्त आहार विहाराचा आभाव यामुळे आपण रोगी होत आहोत, रोग्यांची संख्या वाढत आहे. त्यात कोरोना सारख्या महामारी ने संपूर्ण जग पीडित आहे आयुर्वेद सांगतो की रोग झाल्यावर त्यावर उपाय करण्यापेक्षा रोगच होऊ नये यांसाठी प्रयत्न करा आणि रोग होऊ नये यासाठी प्रमुख उपाय म्हणजे प्राणायाम! प्राणायाम काय आहे?

जो श्वास आपण घेतो तो केवळ O2+N+CO2 आणि अन्य गॅस चे मिश्रण नाही, तर तो प्राण आहे .

ISBN No: 978-81-94206-6-0

एक साधक आपल्या आसनात स्थिर राहून स्थूल श्वासाला नियंत्रित करू शकतो ह्यालाच प्राणायाम म्हणतात.

प्राणायाम दोन प्रकारचा असतो

- अगर्भ प्राणायाम

- सगर्भ प्राणायाम

फक्त श्वास घेणे, श्वास रोखणे,श्वास सोडणे हा अगर्भ प्राणायाम होय.

त्याच प्रमाणे ह्या तिन्ही क्रिया मंत्रासहित करणे म्हणजेच मंत्रासहित श्वास घेणे, मंत्रासहित श्वास रोखणे ,मंत्रासहित श्वास सोडणे याला सगर्भ प्राणायाम असे म्हणतात .

आयुर्वेद सांगते

अयं सगर्भ: सफलः मन्त्रार्थः स्मृति वर्जितः ।

अगर्भ: स्वल्प फलतः कुर्यात् तस्मात् सगर्भकम्।।

मंत्राचे उच्चारण मनात करत त्याचा अर्थ जाणून जो प्राणायाम केला जातो त्याला सगर्भ प्राणायाम म्हणतात तो पूर्ण जीवनभर आरोग्य प्राप्ती देतो . मंत्र रहित प्राणायाम शिकवणारे खूप आहेत. मोबाईल द्वारे इंटरनेट वर खूप काही मिळून जाईल त्यात रामदेव बाबा , अक्षर योगी,.. आणि असे अनेक योगी आहेत ते सर्व अगर्भ प्राणायाम पुरस्कर्ते आहेत.

त्यांचा आपल्याला पुरेपूर फायदा होणार नाही, त्यासाठी विधी पूर्वक प्राणायाम करणे आवश्यक आहे. वृत्रहरित्स्मृति ग्रंथात सांगितले आहे सगर्भ प्राणायाम कसा करावा.

पुरके कुम्भके चैव रेचके च विशेषतः अष्टविवशति वारन्तु जपेन्मन्त्रं समाहितः।

ओम् भूः ॐ भुवः ॐस्वाहा ॐमहः ॐजनः ॐतपः ॐसत्यम् ॐतत्सवितुः वरेण्यं ॐभर्गो देवस्य धीमहि ॐधियो योनः प्रचोदयात् ॐ आपो ज्योति रसोमृतं ब्रह्म भूर्भुवस्वरोम्।१० वेळा प्रणव मंत्राने २८ वेळा श्वास घेणे २८वेळा श्वास रोखणे २८ वेळा श्वास सोडणे असे सांगितले आहे.

स्मृत्यर्थ सागर या ग्रंथात आचार्य चलार्य हे सांगतात प्राणायाम कसा करावा? ह्याविषयी विस्तारित्य सांगितले आहे की अनामिका कनिष्ठिकाभ्यं नमः

अनामिकेने नाकपुडीचा वाम भाग दाबा आणि ॐ भूः ॐ भुवः... या मंत्रांनी श्वास सोडा .

त्यात पहिल्यांदा १६ अक्षर उच्चारण करातान्हा जो वेळ लागतो तेव्हढा वेळ श्वास सोडणे आणि नंतर अङ्गुष्ठेने ३२ अक्षर वेळ पर्यंत श्वास घ्यावा,

नंतर ६४ अक्षरास जेव्हढा वेळ लागतो तेव्हढा वेळ कुंभक करावा, नंतर ४८ अक्षारापर्यंत जेव्हढा वेळ लागतो तेव्हढा वेळ रेचक करावा याप्रमाणे प्राणायामाचा महती आहे .

ISBN No: 978-81-94206-6-0

त्याच प्रमाणे हा पूर्ण प्राणायाम झाला.

जेव्हा आपण प्राणायाम करताना श्वास रोखतो तेव्हा जी हवा शरीरात असते ,ती आपल्या शरीरात फिरत असते त्या वायू रुपी जीवाला पूर्ण शक्ती प्राप्त होते .म्हणजेच ते चैतन्य रूपी जीव शरीरात फिरत असतो त्या चैतन्याला शक्ती प्राप्त होते.शरीरावर माशी बसते तेव्हा अचानक हाताला सूचना मिळते आणि माशी उडवली जाते! आपल्या हातास कसे कळते ??

जीव वायु रूपाने पूर्ण शरीरात व्याप्त असतो त्या कारणाने .प्राणायाम करते वेळी रोखलेला श्वास नसांच्या द्वारा पूर्ण शरीरात फिरत असतो आणि जसे की, होम करते वेळी कुंडात धूर होत असता फुंकल्यावर अग्नी प्रज्वलित होते त्याच प्रमाणे प्राणायामाने जठराग्नी प्रज्वलित होते.प्रज्वलित होऊन पूर्ण शरीरात जो काही दोष आहे, जो काही रोग आहे, जे काही अनावश्यक आहे त्याला जाळून टाकते त्यामुळेच शास्त्रात सांगितले जाते,

( प्राणायाम: दहेत् दोषात्।)

प्राणायाम मुळे डोक्याच्या केसांपासून ते नखांच्या टोकापर्यंत आरोग्य प्राप्ती होते आणि हीच तपस्या मानली जाते. सगळे लोक म्हणतात, मन एकाग्र होत नाही त्यासाठी काय करावे ?

अग्नी पुराणात सांगितले आहे

इन्द्रियाणां जयार्थाय सगर्भं धारयेत् परम्।

इंद्रिया वर अधिपत्यासाठी सगर्भ प्राणायाम करावा,अगर्भ प्राणायाम शक्यतो टाळावा . जर आपणास मंत्र येत नसेल तर नारायण या शब्दाचा वापर पण करू शकता श्री नारायणाय नमः ह्या अष्ट अक्षरांचा प्रयोग करावा ज्यांनी वेदाध्ययन केले आहे त्यांना प्राणायाम हा सगर्भ करणे अनिवार्यच आहे. अश्या प्राणायाम मुळे इंद्रिय निग्रह होतो उच्च प्रतीची एकाग्रता लाभते हे अग्नी पुराणात सांगितले आहे.

शरीरं रथं इत्याहुः इन्द्रियाणि अश्य वाजिनः ।

मनश्च सरथि:प्रोक्त प्राणायाम: कशस्मृत:।।

ज्या व्यक्तीने इंद्रियांवर विजय मिळवला आहे त्याला काहीही अशक्य नाही हे आपण सर्वजण जाणतोच , हे शरीर रथ आहे इंद्रिय घोडे आणि प्राणायाम सारथी आहे. प्राणायामाने आपण इंद्रियांना लगाम लावू शकतो आणि त्याच इंद्रियांनी शरीरा वर प्रभुत्व मिळवू शकतो प्राणायाम एक चाबूक सारखे काम करते जे इंद्रियांना आपल्या नियंत्रणात ठेवते.

प्राणायाम प्रत्यक्ष लाभ

आरोग्यम्।

ISBN No: 978-81-94206-6-0

जीवनात आरोग्य खूप महत्त्वाचे आहे . आजकाल बाजारात काही पॉलिसी आहेत त्यात सांगतात की , कल आप नही रहे तो!?? आपके बच्चो का क्या होगा?? पण काळजी करू नका कारण आपल्या संस्कृती ने आपल्याला सगर्भ प्राणायाम हे जीवन कवच दिले आहे

शीघ्र गामित्वम्।

प्राणायामेन आपण न थकता जास्त काळ चालू शकतो इम्यूनिटी वाढवू शकतो जे आपणास आता खूप गरज आहे.

स्वर सौष्ठवम्।

आवाजाची ताकत वाढते,

वक्तृत्व क्षमतेची धार वाढते ,कित्तेक तास प्रवचन केले तरी थकवा जाणवत नाही

बलम्।

शरीरात बळ जागृत होते.

वर्ण प्रसादश्च।

शरीरात व शरीरावर तेज निर्माण होते .

सर्व दोषः क्षयम् भवेत्।

शरीर व मन यांना पीडित करणाऱ्या दोषांपासून मुक्ती मिळते .

आपण यम ,नियम, आसन .. या सर्व शक्ती प्राप्त करू शकतो कोरोणा मुळे सध्या जग त्रासलेले आहे, प्राणायामाने आपले जीवन नक्कीच बदलेल !!

कोरोना वर मात करण्यासाठी जी औषध रुपी प्रतिकार शक्ती प्राणायामात आहे, त्यामुळे नक्कीच कोरोना वर हा उपाय आपले जीवन वाचवेल. ते म्हणतात ना जान हे तो जहान है!!

चला तर मग उद्या पासून सुरु करूयात प्राणायाम.

ISBN No: 978-81-94206-6-0

# वीरशैव शब्दाचा अर्थ व व्याप्ती

डॉ.शशिकांत बसवेश्वर दरगु
विभाग प्रमुख, संस्कृत विभाग,
नेताजी सुभाषचंद्र बोस महाविद्यालय, नांदेड.

भारतदेश हा विश्वातील सर्वप्राचीन व सर्वसमृद्‌ध संस्कृतीचा वारसा जोपासणारा देश आहे. या देशात आगम व निगम अशा दोन ज्ञानशाखा प्रसिद्‌ध आहेत. जे ज्ञान शिवाच्या मुखातुन उत्पन्न झाले, त्यास आगम तर जे ज्ञान शिवाच्या नि:श्वासातुन उत्पन्न झाले त्यास निगम असे संबोधिले गेले आहे.

**०१ आगम**

**आगम – शब्दाचा अर्थ व व्युत्पत्ती**

आगतं शिववक्त्रास्तु गतं च गिरीजामुखे।
मतं श्रीवासुदेवेन आगमस्तेन कीर्तित:।।[१]

– शिवाच्या मुखातून आलेला आणि माता पार्वतीने श्रवण केलेला उपदेश श्री वासुदेवांनाही सम्मत केला, म्हणुन या शास्त्रास ‘आगम’ असे संबोधतात.

**‘आगम’ शब्दाचा यौगिक अर्थ**

‘आसमन्ताद् अर्थगमयतीति आगम:।’ अर्थात् संपूर्ण तत्त्वांचा उपदेश करणारे ते आगमशास्त्र होय. तसेच ‘आगच्छन्ति बुद्‌धिमारोहन्ति यस्माद् अभ्युदय नि:श्रेयसोपाया: स आगम:।’[२] या व्युत्पत्तीनुसार ज्या शास्त्रामुळे ऐहिक अभ्युदय आणि पारलौकिक मुक्ती या दोन्हीच्या प्राप्तीचे उपाय सहज रीतीने समजतात त्याला आगम म्हणावे, असा वाचस्पती मिश्रांचा स्पष्ट अभिप्राय आहे.

**आगम – तंत्र –** आगमांना ‘तंत्र’ असे पर्यायी नावही आहे. ‘तन्यते विस्तार्यते ज्ञानमनेन’ म्हणजे ज्याच्या अध्ययनाने सर्व प्रकारचे ज्ञान प्राप्त होते, तेच तंत्र होय.

तनोति विपुलानर्थान् तंत्रमंत्रसमन्वितान्।
त्राणं च कुरूते यस्मात् तन्त्रमित्याभिधीयते।।[३]

---

1 भास्करी व्दि.भाग पृ.८५
2 योगसूत्र,१ २५ तत्त्ववैशारदी
3 कामिकागम

ISBN No: 978-81-94206-6-0

### ०२ आगमांचे भेद

आगम किंवा तंत्रांचे ब्राह्मणतंत्र, बौद्धतंत्र व जैनतंत्र असे तीन भेद आहेत. यात ब्राह्मणतंत्र उपास्यदेवतांच्या भेदामुळे शैव, वैष्णव आणि शाक्त या नावाने तीन प्रकार झाले आहेत. वैष्णवागम (पांचरात्रागम), विशिष्टाव्दैताचे प्रतिपादन करतात. शाक्तागम अव्दैताचे प्रतिपादन करतात. तर शैवागम हे व्दैत, अव्दैत, व्दैताव्दैत, विशिष्टाव्दैत आणि शक्तिविशिष्टाव्दैत सिद्धांताचे प्रतिपादक आहेत. शैवागम प्रतिपाद्य पाशुपतशैव आणि सिद्धान्तशैव या दोन्ही व्दैत सिद्धान्ताना, प्रत्यभिज्ञादर्शन – काश्मीर शैवदर्शन, अव्दैत सिद्धान्तास, लकुलीशपाशुपतमत व्दैताव्दैतास, श्रीकण्ठ यांचे शैवदर्शन शैवविशिष्टाव्दैतास आणि वीरशैवदर्शन शक्तिविशिष्टाव्दैत सिद्धान्त मानतात.

### ०३ शैवागम – सिद्धान्तागम

भगवान शिवांनी प्रतिपादन केलेले कामिकापासून वातुलापर्यंत अठ्ठावीस आगम शैवागम मानले जातात. यांना सिद्धान्तागम असेही म्हणतात. 'आप्तोक्तिरत्र सिद्धान्त: शिव एवाप्तिमान् यत:' श्रीकंठ सूरीच्या या वचनाच्या व्याख्यानाच्या वेळी श्री अघोरशिवाचार्यांनी 'सिद्धान्तशब्द: पङ्कजादिशब्दवद्योगरूढया शिवप्रणीतेषु कामिकादिषु दशाष्टादशतन्त्रेषु प्रसिद्ध:'[4] अशाप्रकारे शिवप्रणीत अठ्ठावीस आगमांसाठी सिद्धान्त शब्द वापरला आहे. हे अठ्ठावीस आगम पूढीलप्रमाणे आहेत–

कामिकं योगजं चिन्त्यं कारणं त्वजितं तथा।
दीप्तं सूक्ष्मं सहस्त्रं च अंशुमान् सुप्रभेदकम्।।
विजयं चैव नि:श्वासं स्वायम्भुवमथानिलम्।
वीरं च रौरवं चैव मुकुटं विमलं तथा।।
चन्द्रज्ञानं च बिम्बं च प्रोद्गीतं ललित तथा।
सिद्धं सन्तानशर्वोक्तं पारमेश्वरमेव च।।
किरणं वातुलं चैव अष्टाविंशतिसंख्यया।।[5]

यापैकी पहिले दहा आगम शिवाने उपदेशिल्यामुळे त्यांना 'शैवागम' व अठरा आगम रूद्राव्दारे उपदिष्ट असल्यामुळे 'रूद्रागम' या नावाने प्रसिद्ध आहेत.

---

4 रत्नत्रय पृ.५

5 क्रियासार, भाग १, पृ.९

ISBN No: 978-81-94206-6-0

## ०४ वीरशैव शब्दाचे दार्शनिक निर्वचन

वीरशैव केवळ धर्म नव्हे आणि दर्शनही नव्हे तर उभयरूप आहे. अत: याचे निर्वचनही दोन प्रकारे केले जाते. आम्ही प्रथम दार्शनिक विवेचन करीत आहोत —

वीशब्देनोच्यते विद्या शिवजीवैक्यबोधिका।
तस्यां रमन्ते ये शैवा: वीरशैवास्तु मता:।।
विद्यायां शिवरूपायां विशेषाद्रमणं यत:।
तस्मादेते महाभागा वीरशैवा इति स्मृता:।।
वेदान्तजन्यं यज्ज्ञानं विद्येति परिकीर्त्यते।
विद्यायां रमते तस्यां वीर इत्यभिधीयते।।[६]

श्री. ज. रेणुकाचार्यांच्या या उक्तीत वीरशैव शब्दाचे दार्शनिक निर्वचन केले आहे. याचे तात्पर्य हे आहे —

पाणिनीय धातुपाठांत 'वी गतिव्याप्तिप्रजननकान्त्यानखादनेषु'[७] या प्रकारे गत्यर्थ 'वी' धातु आहे. 'ये गत्यर्थकास्ते ज्ञानार्थका:' या नियमानुसार गत्यर्थक 'वी' धातूचा 'ज्ञान' अथवा 'विद्या' असा अर्थ होतो. 'र' शब्दाचा अर्थ रमण आहे. अशा प्रकारे 'वी' शब्दाने प्रतिपाद्य अशी जी शिव आणि जीवाच्या अभेदाचा बोध करणारी विद्या आहे, तिच्यात रमणारे शिवभक्तच 'वीरशैव' होत.

## ०५ वीरशैव शब्दाचे धार्मिक निर्वचन

वीरशैव धर्मात श्रीसद्गुरू दीक्षेच्या व्दारे इष्टलिंग प्रदान करून ते आजीवन शरीरावर धारण करण्याचा आदेश देतांना म्हणतात —

प्राणवध्दारणीयं तत्प्राणलिंगमिदं तव। कदाचित् कुत्रचिद्वापि न वियोजय देहत:।।[८]

हे शिष्या, तुला जे इष्टलिंग दिले गेले आहे, त्यास तू प्राणाप्रमाणे धारण कर, कोणत्याही परिस्थितीत याचा आपल्या शरीरापासून वियोग होऊ देऊ नकोस.

जी व्यक्ती गुरूच्या आज्ञेनुसार अत्यंत सावधानतेने आचरण करीत कदाचित् प्रमादाने इष्टलिंगाचा शरीरापासून वियोग झाल्यानंतर प्राण त्याग करण्याचे वीरव्रत पालन करतो, तोच वीरशैव होय.

---

[6] सि.शि.५।१५—१६, १८, पृ.५७,५८
[7] अदादि.११३३, पाणिनी धातुपाठ:।
[8] सि.शि.६।५,पृ.९०

ISBN No: 978-81-94206-6-0

इष्टलिंगवियोगे वा व्रतानां वा परिच्युतौ।

तृणवत् प्राणसन्त्याग इति वीरव्रत मतम्।।

भक्त्युत्साहविशेषोऽपि वीरत्वमिति कथ्यते।

वीरव्रतसमायोगाद् वीरशैव प्रकीर्तितम्।।[९]

आगमाच्या या वचनात हे स्पष्ट सांगितले आहे. म्हणुन 'वीरश्चासौशैवश्च वीरशैव:' या व्युत्पत्तिव्दारे या लोकांमध्ये शिवाप्रती असणाऱ्या भक्तीच्या पराकाष्ठेचे प्रतिपादन केले जाते. तेथे जे वीरत्व सांगितले आहे. ते शारीरिक बलप्रयुक्त नव्हे, तर भक्त्युत्साहप्रयुक्त समजले पाहिजे. षडक्षरमन्त्री म्हणतात —

वीरत्वमस्य न धनेन न वा बलेन

नो कार्यतश्च विहितं दृढशम्भुक्त्या।

वीरस्तुरीय इति शङ्करभाषणेन

श्रीवीरशैवमतगान्न परोऽस्ति कश्चित्।।[१०]

युद्धभूमीवर युद्ध करणारा योद्धा आपल्या स्वामीच्या ठिकाणी अत्यंत श्रद्धा ठेवून, त्याच्यासाठी आपल्या प्राणाचाही त्याग करतो, तद्वतच शिवामध्ये भक्ति ठेवणारा हा भक्त आपल्या शरीरात असलेली ममत्वबुद्धी त्यागुन प्रसंगवशात् भगवान शिवासाठी विकल्परहित होऊन आपल्या प्राणाचाही त्याग करतो.

नीलकण्ठ शिवाचार्य म्हणतात —

विशब्दो वा विकल्पार्थो रशब्दो रहितार्थक:।

विकल्परहितं शैवं वीरशैवं प्रचक्षते।।[११]

## ०६ 'वीरशैव' पदाचा अर्थ

इष्टलिंगधारण करणारा हा शिवभक्त आपल्या लौकिक व पारमार्थिक व्यवहारात अन्य सर्व लोकांहून अत्यंत विलक्षण रूपाने प्रतीत होतो. या विलक्षण आचारामुळेही यांना वीरशैव म्हटले जाते.

वातुलशुद्धाख्यतन्त्रात —

---

[9] चन्द्रज्ञानागम.क्रियापाद,१०।३३—३४

[10] वी.धर्म.शिरो. १।१६

[11] क्रियासार, भाग.१,पृ.११

ISBN No: 978-81-94206-6-0

विशिष्ट ईयते यस्माद् वीर इत्यभिधीयते।

शिवेन सह सम्बन्धं शैवमित्यादृतं बुधैः।।

उभयोः सम्पुटीभावाद् वीरशैवमिती स्मृतम्।

शिवायार्पितजीवत्वाद् वीरतन्त्रसमुद्भवात्।

वीरशैवसमायोगाद् वीरशैवमिती स्मृतम्।।[१२]

या वचनात 'विशिष्ट ईयते इति वीरः' शब्दाची व्युत्पत्ति दाखवून, त्या विशिष्ट आचारसंपन्न शैवास वीरशैव म्हटले गेले आहे.

श्री नीलकंठशिवाचार्यांनी क्रियासारांत —

विरोधार्थो विशब्दः स्याद् रशब्दो रहितार्थकः।

विरोधरहितं शैवं वीरशैवं विदुर्बुधाः।।[१३]

या श्लोकात वीरशैव शब्दाची व्युत्पत्ति 'विरोधरहितं' या अर्थी दर्शवून वीरशैवांचे सर्व लोकानुरागित्व सिद्ध केले आहे. यावरून हे दिसून येते की वीरशैव लोक प्राणीमात्रांच्या ठायीसुद्धा अनुराग करीत आहेत आणि पुढेही करतील.

उपर्युक्त विवेचनावरून हे सिद्ध होते की, सद्गुरूकडून दीक्षेत प्राप्त झालेल्या इष्टलिंगास आपल्या शरीरापासून कदापि विलग न करता जो सावधानतेने धारण करतो आणि प्रसंगोपात् भगवान शिवासाठी प्राणत्याग करण्यासही तत्पर राहतो आणि जो विरोधभावनेचा सर्वथा त्याग करून सर्व प्राणिमात्रांवर सदैव प्रेम करतो, तोच वीरशैव होय.

स्कन्दपुराणातील शंकरसंहितेच्या —

यो हस्तपीठे निजमिष्टलिंगं विन्यस्य तल्लीनमनः प्रचारः।

बाह्यक्रियासंकुलनिस्पृहात्मा सम्पूजयत्यंग स वीरशैवः।।

या श्लोकात करपीठावर इष्टलिंगार्चनेचा विधी संपन्न करून, त्याप्रकारच्या अर्चनेत अनुरक्त असलेल्या व्यक्तीसच वीरशैव संज्ञा दिली गेली आहे. यावरून वीरशैव इष्टलिंगार्चना किती प्राचीन कालापासून चालत आली आहे, हे सिद्ध होते.

महर्षी वेदव्यास यांनी —

[12] १०.२७—२९

[13] भा.१.पृ.११

ISBN No: 978-81-94206-6-0

शैलादेन महाभागा विचित्रा लिंगधारका:।

शवस्योपरी लिंगं च ध्रियते च पुरातनै:।।

लिंगेन सह पञ्चत्वं लिंगेन सह जीवनम्।।[१४]

स्कन्दपुराणाच्या या वचनात वीरशैवांची शिवलिंगनिष्ठा अतिशय सुंदर रीतीने चित्रित केलेली आहे.

**०७ वीरशैवांचे प्रभेद**

वीतरागादिदोषत्वादात्मतत्त्वविचारणात्।

विकल्पाकल्पशून्यत्वाद्वीरशैवमिति स्मृतम्।।

सामान्यं प्रथमं प्रोक्तं विशेषञ्च व्दितीयकम्।

निराभारं तृतीयं स्यात् क्रमाल्लक्षणमुच्यते।।[१५]

सूक्ष्मागमाच्या या प्रमाणवचनांत सामान्य, विशेष आणि निराभार असे वीरशैवांचे तीन भेद दाखविले आहेत. हे तिन्ही भेद त्यांची क्रमाने उन्नति दर्शवितात यांच्यामध्ये 'सामान्यनियमान् य: परिपालयति स: सामान्यवीरशैव' या वचनानुसार जो गुरूदीक्षेनंतर नियमाने इष्टलिंगाची पूजा, पूजनीय गुरू व जंगमांची सेवा आदि वीरशैवीय सामान्य नियमांचे पालन करतो, त्यास 'सामान्य वीरशैव' असे म्हणतात.

'विशिष्टधर्मानुष्ठानाद्विशेष इति कथ्यते' या आगमोक्तीनुसार जो पूर्वोक्त सामान्य नियमांचे परिपालन करून पवित्रमनस्क होउन वीरशैवोक्त भक्त, महेश, प्रसादी, प्राणलिंगी, शरण व ऐक्य नामक मुक्तीच्या क्रमिक सोपानाच्या स्वरूपात विद्यमान असलेल्या षट्स्थल तत्त्वांची गुरूमुखाने विशेष माहिती करून घेतो त्याला 'विशेष वीरशैव' म्हणतात.

'निवृत्तकर्मभारत्वान्निराभार इति स्मृत:' आगमाच्या या वचनानुसार उपर्युक्त विशेष जेव्हा आपली सर्व कर्तव्ये पूर्ण करून कृतकृत्य होऊन जीवन्मुक्ताप्रमाणे नि:स्पृहवृत्तीने जीवन व्यतीत करतो, तेव्हा त्याला 'निराभार वीरशैव' म्हणतात. याप्रमाणे हे त्रिविध भेद व्यक्तीच्या क्रमिक आध्यात्मिक विकासाचा परिचय देणारे आहेत.

---

[14] स्कन्द. केदारनाथ, ७।४१—४२

[15] सूक्ष्मागम, क्रियापाद,७।२९—३०

ISBN No: 978-81-94206-6-0

## ०८ वीरशैवांचा दार्शनिक सिद्धान्त

न वीरशैवसदृशं मतमस्ति जगत्त्रये।

सर्वभोगप्रदं पुण्यं शिवसायुज्यदायकम्।।[१६]

पारमेश्वर आगमाच्या या वचनानुसार परमपावन वीरशैव धर्माचा दार्शनिक सिद्धांत 'विशेषाव्दैत, शिवाव्दैत आणि शक्तिविशिष्टाव्दैत' आदि सार्थ नावांनी ओळखला जातो. या नावांचे व्युत्पत्तिपूर्वक विश्लेषण केल्याने त्याचे दार्शनिक तत्त्व प्रकट होते.

**विशेषाव्दैत**

'विश्च शेषश्च विशेषौ ईशजीवौ तयोरव्दैतं विशेषाव्दैतम्' ही विशेषाव्दैत शब्दाची व्युत्पत्ति आहे. हिचे तात्पर्य हे आहे की, 'विश्चक्षुषि व्योम्नि वाते परमात्मनि पक्षिणि'[१७] निघण्टुच्या या वचनाने 'वी' शब्दाचा अर्थ परमात्माही होतो. 'वाति उत्पादयाति जगदिति वि:' या व्युत्पत्तीने 'वि' वर्णाने जगाला कारणीभूत असलेला ईश्वर सिद्ध होतो. जरी अमरकोषांत 'वि' चा अर्थ पक्षी दाखविला गेला आहे. तथापि 'व्दा सुपर्णा सयुजा सखाया'[१८] मुण्डकाच्या  या वचनात परमात्म्याचे पक्ष्याच्या रूपांतही या वचनात परमात्म्याचे पक्ष्याच्या रूपांतही वर्णन केले गेले आहे. अत: प्रकृतमध्ये 'वि' चा अर्थ परमात्माच घेतला पाहिजे. शेष शब्दाने त्याचा अंशरूप जीवात्मा अभिप्रेत आहे. 'यथाऽग्ने: क्षुद्रा विस्फुलिंगा'[१९] या श्रुतीत अग्निकणाच्या दृष्टान्ताने जीवात्म्यास परमात्म्याचाच अंश सिद्ध केले आहे. अशा प्रकारे अंशाशीभावाने सिद्ध जीव व परमात्मा यांच्यामध्ये 'यथा नद्य: स्यन्दमाना'[२०] ही श्रुती अव्दैताचे बोध करविते. संसारदशेत अत्यन्त भिन्नस्वरूपी शिव आणि जीव यांच्या मुक्तावस्थेत अभेद स्थिती प्रतिपादन करणाऱ्या सिद्धान्तास विशेषाव्दैत या नावाने ओळखले जाते.

विशब्देनोच्यते शम्भुर्हंसहंसेति मन्त्रत:।

शेषशब्देन शारीरी यथाग्नेरिति मन्त्रत:।।

---

[16] पारमेश्वरागम.१ ।४२

[17] एकाक्षरकोष पृ.१८

[18] मुण्डको.३ ।१ ।१

[19] बृहदारण्यको २ ।१ ।२०

[20] मुण्डको ३ ।२ ।८

ISBN No: 978-81-94206-6-0

अव्दैतेन भवेद्योगो तथा नद्य इति श्रुते:।[२१]

या श्लोकात भाष्यकार श्रीपतिपण्डिताराध्य यांनी विशेषाव्दैताचे तात्पर्य संक्षेपात सांगितले आहे.

**शिवाव्दैत**

'शिवश्च शिवश्च शिवौ, तयोरव्दैतं शिवाव्दैतम्' ही या शब्दाची व्युत्पत्ति आहे. पहिल्या शिवशब्दाने परमात्मा अभिप्रेत आहे आणि दुसऱ्या शिवशब्दाने त्याचाच अंशभूत जीवात्मा प्रतिपाद्य आहे. संसारदशेत उपास्य आणि उपासकांच्या रूपांत विद्यमान असलेल्या या दोहोंचा मुक्तावस्थेत अव्दैत स्थिती दाखविणारा सिद्धान्तच शिवाव्दैत सिद्धान्त होय.

**शक्तीविशिष्टाव्दैत**

'शक्तीश्च शक्तीश्च शक्ती, ताभ्यां विशिष्टौ शक्तीविशिष्टौ शिवजीवौ, तयोरव्दैतं शक्तीविशिष्टाव्दैतम्' या व्युत्पत्तीनुसार सर्वज्ञत्व, सर्वकर्तृत्व आदि सूक्ष्मचिदचित्शक्तीविशिष्ट शिव आणि अल्पज्ञत्व, अल्पर्तुत्व आदि स्थूलचिदचित्शक्तीविशिष्ट जीव या दोहांच्या अभेदास अर्थात् अव्दैतास दाखविणारा सिद्धान्तच शक्तीविशिष्टाव्दैत सिद्धान्त होय. भ्रमर—कीटक न्यायाने भिन्न स्वभावाचा कीटक भ्रमराच्या निरन्तर ध्यानाने भ्रमर बनतो. तव्दतच शिवापासून अत्यंत भिन्न स्वभावाचा जीवसुद्धा शिवाचे निरन्तर ध्यान करून आपल्या संकुचित शक्तीचा विकास करून शिवस्वरूप होऊन जातो. हेच शक्तिविशिष्टाव्दैताचे तात्पर्य होय.

वीरशैवांच्या या दार्शनिक पारिभाषिक शब्दांच्या विश्लेषणाने हा सिद्धान्त भेदाभेदप्रतिपादक आहे, याचे ज्ञान होते. अत: याला भेदाभेद आणि व्दैताव्दैत शब्दानेही अभिहित केले जाते.

**०९ वीरशैव धर्म—दर्शनाची व्याप्ती**

यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भूतले।

तदा तदाऽवतारोऽयं गणेशस्य महीतले।।

स्कन्दपुराणाच्या या प्रमाणवचनाने धर्माला ग्लानी आल्यानंतर भगवान शिव आपले विशेष अंश असलेल्या शिवगणांच्या रूपांत अवतरित होऊन प्रत्येक युगाच्या

[21] श्रीकरभाष्य, मंगलश्लोक १६

ISBN No: 978-81-94206-6-0

प्रारंभी धर्माची स्थापना करतात. या सनातन वीरशैव धर्माचे संस्थापक पाच आचार्य आहेत. शिवाच्या सद्योजात, वामदेव, अघोर, तत्पुरुष आणि ईशान मुखाच्या रूपाने, विराजमान कुल्यपाक येथील श्री सोमेश्वरलिंग, वटक्षेत्रातील श्री सिद्धेश्वरलिंग, द्राक्षारामक्षेत्रातील श्री रामनाथलिंग, सुधाकुण्डक्षेत्रातील श्री मल्लिकार्जुनलिंग आणि काशीक्षेत्रातील श्री विश्वनाथलिंग या पाचही शिवलिंगापासून क्रमशः श्री रेवणाराध्य, श्री मरूळाराध्य, श्री एकोरामाराध्य, श्री पंडिताराध्य व श्री विश्वाराध्य नावाचे पाच आचार्य प्रत्येक युगात विभिन्न नावांनी अवतरित होऊन वीरशैव धर्माची स्थापना करीत आले आहेत. त्यांचे संक्षिप्त विवरण खालीलप्रमाणे आहे –

**१ .श्री जगद्गुरू रेवणाराध्य**

श्री जगद्गुरू रेवणाराध्य शिवाच्या आदेशानुसार वीरशैव धर्माच्या स्थापनेसाठी प्रत्येक युगात आंध्रप्रदेशातील सुप्रसिद्ध कोल्लिपाक क्षेत्रातील सोमेश्वरलिंगापासून अवतार घेत आले आहेत. त्यांची नावे – कृतयुगात एकाक्षर शिवाचार्य, त्रेतायुगात एकवक्त्र शिवाचार्य, व्दापरयुगात रेणुक शिवाचार्य आणि कलियुगात रेवणाराध्य किंवा रेवणसिद्ध या नावाने प्रसिद्ध आहेत.

अथ त्रिलिंगविषये कुल्ल्यपाकाभिधे स्थले।
सोमेश्वरमहालिंगात् प्रादुरासीत् स रेणुकः।।[22]

सिद्धान्तशिखामणितील या श्लोकानुसार व्दापरयुगातील श्री जगद्गुरू रेणुकशिवाचार्यांनी कोल्लिपाक येथील श्री सोमेश्वरलिंगापासून अवतार घेऊन मलयपर्वतावर विराजमान असलेल्या महामहिमाशाली श्री अगस्त्य महर्षींना वीरशैव सिद्धांताचा उपदेश केला. शिवयोगी शिवाचार्यांनी संग्रहित केलेला तो उपदेशच आजमितीस 'सिद्धान्तशिखामणि' या नावाने प्रसिद्ध आहे. धर्मप्रचारार्थ यांनी कर्नाटकातील 'बाळेहोन्नुर' येथे पीठाची स्थापना केली. ते पीठ रंभापूरी पीठ या नावाने प्रसिद्ध आहे. यांची शाखा रेणुक शाखा आहे. यांचे सिंहासन वीरसिंहासन आहे. हे वीरगोत्राचे आदिगुरू मानले जातात.

तस्येति वचनं श्रुत्वा राक्षसेन्द्रस्य धीमतः।

---

[22] सि.शि.४।९

ISBN No: 978-81-94206-6-0

तथेति प्रतिशुश्राव सर्वज्ञो गणनायक:।।

तत्र सन्तुष्टचित्तस्य पौलस्त्येष्टसिद्धये।

कोटित्रयं तु लिंगानां यथाशास्त्रं यथाविधि।।

त्रिकोटयाचार्यारूपेण स्थापितं तेन तत्क्षणे।।[२३]

सिद्धान्तशिखामणीच्या या वचनावरून हे सिद्ध होते की, रावणाने आपल्या जीवनकालामध्ये ०९ कोटी शिवलिंगाची स्थापना करण्याचा संकल्प केला होता. परंतु तो सहा कोटी लिंगाचीच स्थापना करू शकला. मृत्युसमयी त्याने आपला धाकटा भाऊ बिभीषणाकडून स्थापन करण्याची राहिलेली तीन कोटी शिवलिंगे स्थापन करण्याचे वचन घेतले होते. जेव्हा श्री रेणुकाचार्य आकाशमार्गाने लंकेत पोचले ते पाहून व त्यांचा महिमा जाणून बिभीषणाने आपल्या भावाचा संकल्प पूर्ण करण्याची त्यांना प्रार्थना केली. बिभीषणाच्या प्रार्थनेनुसार श्री रेणुकाचार्यांनी एकाच वेळी तीन कोटी आचार्यांचे रूप धारण करून तीन कोटी शिवलिंगाची स्थापना करून कोल्लिपाक क्षेत्रांत येऊन पुन्हा त्याच सोमेश्वरलिंगात शिवाज्ञेने विलीन झाले.

श्रीमद्रेवणसिद्धस्य कुल्यपाकपुरोत्तमे।

सोमेशलिंगाज्जननमावास: कदलीपुरे।।

स्वायंभुव आगमातील या वचनानुसार तेच रेणुकाचार्य कलियुगाच्या प्रारंभी त्याच सोमेश्वरलिंगापासून रेवणसिद्ध या नावाने अवतरित झाले. त्यांनी चौदाशे वर्षे भूतलावर निवास करून अनेक लीला केल्या. त्यात विक्रमराजाच्या नावे विक्रमसंवत चालु आहे त्यास विजयखड्ग प्रदान करणे, कांची येथील विजयेन्द्र चोल राजास अनुग्रह करणे, कोल्हापूरच्या गोरक्षनाथाचे गर्वहरण करणे आणि जगद्गुरू आदि शंकराचार्यांना श्री चंद्रमौलीश्वरलिंग व रत्नगर्भ गणपती प्रदान करणे इत्यादी प्रसिद्ध आहेत.

जगद्गुरू आद्यशंकराचार्यांचे चरित्र प्रतिपादन करणारे अनेक ग्रंथ आहेत. त्यांत ‘गुरूवंशकाव्य’ नावाचा एक ग्रंथ आहे. तो श्रृंगेरी पीठाचे आस्थानपंडित काशीलक्ष्मण शास्त्रींनी लिहिला आहे. त्यात –

श्रीचंद्रमौलीश्वरलिंगमस्मै सद्रत्नगर्भ गणनायकंच ।

[23] सि.शि.२१ ।३०–३१

स विश्वरूपाय सुसिद्धदत्तं दत्वा न्यगादीच्चिरमर्चयति।।[२४]

जगद्गुरू श्री शंकराचार्य श्रृंगेरीहून कांचीस जातेवेळी त्यांनी आपला पट्टशिष्य सुरेश्वराचार्य यास बोलावून श्री रेवणसिद्ध महायोग्यांनी दिलेले चन्द्रमौलीश्वर आणि रत्नगर्भ विनायक त्याच्या स्वाधीन केले आणि त्यांच्या पूजेची जबाबदारी त्याच्यावर सोपविली. या श्लोकाची व्याख्या लिहीतांना ग्रंथकाराने 'सुसिद्धवत्तं सुसिद्धेन रेवणसिद्धमहायोगिना दत्तं श्रीचंद्रमौलीश्वरलिंगम्' असा सुसिद्ध शब्दाचा अर्थ रेवणसिद्ध महायोगी असा स्पष्ट केला आहे. आजपर्यंत श्रृंगेरी पीठात विराजमान असलेले श्री चंद्रमौलीश्वरलिंग वीरशैव मताचे संस्थापक कलियुगातील आचार्य श्री रेवणसिद्ध महायोगी यांच्याकडुन प्राप्त झाल्याचे सिद्ध होते.

आचार्य बलदेव उपाध्याय यांनी हिंदीत 'शंकरदिग्विजय' ग्रंथ लिहीला आहे. गुरूवंश काव्यानुसार श्री शंकराचार्यांचे चरित्र लिहितांना त्याचे वैशिष्टय त्यांनी पुढीलप्रमाणे दाखविले आहे.

'शारदा को हराया और उन्हे श्रृंगेरी में अपने साथ ले आये। शारदा की प्रतिष्ठा की और चंद्रमौलीश्वरलिंग, जिसे रेवणमहायोगीने दिया था, रत्नगर्भ विनायक तथा शारदा की पूजा का भार सुरेश्वर पर रखकर वे कांची पधारे।'[२५]

'गुरूवंशकाव्य' ग्रंथासंबंधी आचार्य बलदेव उपाध्याय म्हणतात –

'ग्रंथकार के श्रृंगेरीमठ के पंडित होने से तथा हस्तलिखित प्रति श्रृंगेरी से उपलब्ध होने के कारण यह अनुमान करना असंगत न होगा कि इस ग्रंथ में दिया गया चरित्र श्रृंगेरी परंपरा के अनुसार ही है। ग्रंथ की पुष्पिका में सच्चिदानन्दभारतीमुनीद्रनिर्यापिते' से इसकी पुष्टि भी होती है।[२६] ग्रंथकार श्रृंगेरीमठाचे पंडित होते. हस्तलिखित प्रत श्रृंगेरीतच उपलब्ध झाली. या ग्रंथात दिलेले चरित्र श्रृंगेरी परंपरेला अनुसरूनच आहे. ग्रंथाच्या पुष्पिकेत 'सच्चिदानन्दभारतीमुनीन्द्रनिर्मापिते' असे लिहीले आहे. त्यावरून या विधानास पुष्टी मिळते.

निट्टूर आचार्य विरचित वेदान्तसारवीरशैवचिन्तामणि या ग्रंथात –

---

[24] ३ ।३३ ।।

[25] शंकरदिग्विजय, परिशिष्ट क पृ.५८८

[26] शंकरदिग्विजय पृ.५८६

ISBN No: 978-81-94206-6-0

शंकराचार्यसन्नामयोगीन्द्राय महोज्ज्वलम्।
चन्द्रमौलीश्वरं लिंगं दत्तवानिति विश्रुतम्।।
श्रीरेणुकगणेशाख्यं रेवणासिद्धदेशिकम्।
वीरशैवमताचार्य वन्देऽहं तं जगद्गुरूम्।।

स्तोत्ररूपाने लिहिलेल्या या श्लोकाने रेणुकाचार्याचाच दुसरा अवतार जो रेवणसिद्ध या नावाने झाला होता, त्यांच्याकडुन आद्यशंकराचार्यांनी श्रीचंद्रमौलीश्वरलिंगाची प्राप्ती झाली होती. ही गोष्ट सिद्ध होते. श्री जगद्गुरू शंकराचार्य श्रृंगेरीपीठ व श्री जगद्गुरू रंभापूरी पीठ दोन्ही समीप आहेत व त्या दोहोमध्ये अत्यंत मधुर संबंध आहेत.

**०२. श्री जगद्गुरू मरूळाराध्य**

भगवान शिवाच्या आज्ञेवरून श्री जगद्गुरू मरूळाराध्य, वीरशैव धर्माच्या स्थापनेसाठी क्षिप्रा नदीच्या काठी विराजमान असलेल्या वटक्षेत्रातील सिद्धेश्वर लिंगापासून प्रत्येक युगात अवतार घेत आले आहेत. कृतयुगात व्दयक्षर शिवाचार्य, त्रेतायुगात व्दिवक्त्रशिवाचार्य, व्दापरयुगात दारूकशिवाचार्य आणि कलियुगात मरूळाराध्यशिवाचार्य अशाप्रकारे प्रत्येक युगांत त्यांची भिन्न नावे आहेत.

तव्दन्मरूळसिद्धस्य वटक्षेत्रे महत्तरे।
सिद्धेशलिंगाज्जननं स्थानमुज्ययिनीपुरे।।

स्वायंभुव आगमांच्या या वचनानुसार यांनी धर्मप्रचारार्थ उज्जयिनी मध्यप्रदेश येथे पीठाची स्थापना केली. ते उज्जयिनी पीठ या नावाने प्रसिद्ध आहे. अलीकडे ते पीठ मध्यप्रदेशातून कर्नाटकातील बल्लारी जिल्हयातील ‘उज्जयिनी’ नगरात स्थानान्तरित झाले आहे. या पीठाचे व्दापरयुगाचे आचार्य दारूकाचार्य होते. त्यांनी त्याकाळी सुप्रसिद्ध दधीचि महर्षींना शिवतत्त्वाचा उपदेश करून कृतार्थ केले होते. कलियुगातील श्री जगद्गुरू मरूळाराध्य हे नंदी गोत्राचे आद्यगुरू आहेत. यांची शाखा दारूकशाखा आहे. सिंहासन सद्धर्मसिंहासन या नावाने प्रसिद्ध आहे. श्री जगद्गुरू मरूळाराध्य यांनी आपल्या कालखंडात सर्वत्र संचार करून वीरशैव धर्माच्या स्थापनेबरोबरच आपली शिष्यसम्पत्ति वाढविली. त्यांच्या अवताराचे प्रयोजन समाप्त होताच पुन्हा ते

ISBN No: 978-81-94206-6-0

सिद्धेश्वरलिंगात विलीन झाले. त्यांच्यानंतर त्या पीठाची परंपरा अक्षुण्ण चालत आलेली आहे.

**०३. श्री जगद्गुरू एकोरामाराध्य**

श्री जगद्गुरू एकोरामाराध्य यांनी शिवाच्या आदेशानुसार वीरशैव मताच्या स्थापनेसाठी द्राक्षाराम क्षेत्रातील श्रीरामनाथलिंगातून अवतार घेतला. कृतयुगात त्र्यक्षरशिवाचार्य, त्रेतायुगात त्रिवक्त्रशिवाचार्य, द्वापरयुगात घण्टाकर्णशिवाचार्य आणि कलियुगात एकोरामाराध्य ही त्यांची नावे होत.

द्राक्षारामे रामनाथलिंगाद्युगचतुष्टये।

एकोरामस्य जननमावास्तु हिमालये।।

स्वायंभुव आगमाच्या या वचनानुसार यांनी धर्मप्रसारार्थ हिमालयात पीठाची स्थापना केली ते 'केदारपीठ' या नावाने प्रसिद्ध आहे. यालाच 'वैराग्यसिंहासन' असे संबोधिले जाते.

या पीठाचे कृतयुगातील आचार्य त्र्यक्षर शिवाचार्यांकडून तदानीन्तन सूर्यवंशाचे महाराज मान्धाता यांनी शिवसिद्धान्ताचा उपदेश प्राप्त केला होता. त्यांनी आपले आयुष्य अंतिम क्षणापर्यंत या पीठाच्या सेवेतच व्यतित केले. त्याचे प्रतीक म्हणून त्यांची एक शिलामूर्ती अद्याप त्या पीठात विराजमान आहे.

या पीठाचे द्वापरयुगातील आचार्य घण्टाकर्ण शिवाचार्य यांनी सर्व शिवक्षेत्रात संचार करीत शिवतत्त्वाचा प्रचार केला. शिवाशिवाय अन्य कोणत्याही देवतेचे नाव ऐकु येऊ नये म्हणुन त्यांनी आपल्या कानात कुण्डलाच्या ऐवजी लहान घंटी आभूषण म्हणुन धारण केली होती. त्यामुळे त्यांचे घंटाकर्ण शिवाचार्य पडले. हे काशीला येऊन गंगातीरावर बराच काळ राहीले होते. त्याच काळात त्यांनी व्यास महर्षींना शिवतत्त्वाचा उपदेश केला. काशी येथे व्यासेश्वर शिवमंदीरात हातावर शिवलिंग ठेवून पूजेत मग्न असलेली एक मूर्ती आहे. तिला आजही 'व्यासांचे गुरू' म्हणुन संबोधतात. ती मूर्ती घण्टाकर्ण शिवाचार्यांचीच आहे. त्या मंदीराजवळ तलाव होता, त्यास घण्टाकर्ण तलाव म्हणत असत, हल्ली तेथे तो तलाव नाही.

कलियुगाच्या प्रारंभी या पीठाचे जगद्गुरू एकोरामाराध्य हे होते. यांच्या काळात बाणसुराची कन्या उषा हिने येथे राहुन शास्त्रांचे अध्ययन केले होते. गुरूकृपेने ती

ISBN No: 978-81-94206-6-0

विदुषी होऊन उषादेवी या नावाने प्रसिद्‌ध झाली होती. श्रीमती उषादेवी व तिचा पती अनिरूध्द यांनी अनेक वर्षे केदारपीठात राहुन गुरूसेवेप्रीत्यर्थ भव्य मठाची स्थापना केली. ‘उषामठ’ म्हणुन तो मठ प्रसिद्‌ध आहे. आज हा मठ ‘ऊखीमठ’ म्हणुन संबोधिला जातो.

श्री एकोरामाराध्यांच्या तपप्रभावाने अनेक राजे महाराजे त्यांचे शिष्य झाले. त्यांनी भूमिदान देऊन आपल्या जीविताचे सार्थक केले. राजा जनमेजय यांनी आपल्या जीविताचे सार्थक केले. राजा जनमेजय यांनी भूदान दिलेल्या उल्लेखाचा ताम्रपट अद्याप ऊखीमठात आहे. तो पुढीलप्रमाणे आहे —

।। श्री केदारेश्वराय नम:।।

स्वस्ति श्रीजयाभ्यूदययुधिष्ठिरशके प्लवंगांख्ये एकोननवतिमन्वन्तरे सहसि मासि अमावास्यायां सोमवासरे श्रीमन्महाराजाधिराजपरमेश्वरवैयाघ्रापद गोत्रज श्रीजनमेजय—भूपइन्द्रप्रस्थनगरीसिंहासनस्था: सकलवर्णाश्रमधर्मपरिपालका उत्तरहिमालये श्रीकेदारक्षेत्रे तत्रत्यमुनिरूषामठस्य श्रीगोस्वामिआनन्दलिंगजंगमश्रीमच्छिष्यज्ञानलिंगजंगमव्दारा आराधितश्रीकेदारनाथस्य पूजार्थं चतु:सीमापरिमितक्रम:। पूर्वभागे दक्षिणवाहिनी मन्दाकिनी, पश्चिमदक्षिणभागे क्षीरगंगा, उत्तर पश्चिमे मधुगंगा पूर्वोत्तरभागे स्वर्गव्दारनदी दक्षिणे सरस्वतीमन्दाकिन्यो: संगम:। एतन्मध्ये श्रीकेदारक्षेत्रम्। भवच्छिष्यपरम्परया चन्द्रार्कपर्यंत निधिनिक्षेपजलपाषाणागामिसिद्‌धसाध्यतेज: स्वाम्यसहितं स्वबुध्यानुकूल्येनास्मन्मातृपितृणां शिवलोकप्राप्तथ श्रीकेदारेश्वरसन्निधावुपरागसमये सहिरण्यमन्दाकिनीजलधारापूर्वक क्षेत्रमिदं हस्ते दत्तवानस्मि। एतद्‌धर्मसाधनस्य साक्षिण: —

आदित्यचन्द्रावनिलोऽनलश्च द्यौर्भूमिरापो हृदयं यमश्च।
अहश्च रात्रिश्च उभेच सन्ध्ये धर्मश्च जानन्ति नरस्य वृत्तम्।।
दानपालनयोर्मध्ये दानाच्छं योऽनुपालनम्।
दानात् स्वर्गमवाप्नोति पालनाद् व्दिगुणं फलम्।।
स्वदत्ताद् व्दिगुणं पुण्यं परदत्तानुपालनम्।
परदत्तापहारेण स्वदत्तं निष्फलं भवेत्।।
स्वदत्ता पुत्रिका ज्ञेया पितृदत्ता सहोदरा।
अन्यदत्ता तु जननी दत्तभूमिं परित्यजेत्।।

ISBN No: 978-81-94206-6-0

अन्यैस्तु छदितं भुंक्ते स्वार्थश्च छर्दितं न तु।

ततः कष्टस्ततो नीचः स्वयं दत्तापहारकः।।

स्वदत्ता परदत्तां वा ब्रह्मवृत्ति हरेच्च यः।

षष्टिवर्षसहस्राणि विष्टायां जायते क्रिमिः।।इति।।

याचे तात्पर्य असे —

हिमवत् केदारमध्ये महाराजा जनमेजय यांच्या कारकिर्दीत स्वामी आनंदलिंग जंगम येथील मठाचे जगद्गुरू होते. त्यांच्या नावाने जनमेजयांनी मंदाकिनी, क्षीरगंगा, सरस्वती आदि नद्यांच्या संगमाच्या क्षेत्रांत जेवढी भूमी आहे, त्याला केदारक्षेत्र म्हणतात. त्याचे दान या उद्देशाने केले की ऊखीमठाचे आचार्य गोस्वामी आनंदलिंग जंगम यांचे शिष्य श्री केदारक्षेत्रनिवासी श्री ज्ञानलिंग जंगम यांनी याच्या उत्पन्नातुन भगवान केदारेश्वराची पूजा करावी. त्यांनी सूर्यग्रहणसमयी केदारेश्वरास साक्षी ठेवून आपल्या माता–पित्याच्या शिवलोकप्राप्तीसाठी त्यांना हे क्षेत्र पूर्ण अधिकारासहित दान दिले आहे. हे दान महाराजा जनमेजय यांनी मार्गशीर्ष अमावस्येस सोमवारी युधिष्ठिर राजाच्या राज्यारोहणास ८९ वर्षे झाल्यानंतर प्लवंगनाम संवत्सरात दिले.

या दानपत्राच्या आधारावर श्री केदारेश्वरांचे मंदीर आणि ऊखीमठ पांच हजार वर्षाहुन अधिक पुरातन आहे. हे सिद्ध होते. टेहरी नरेश या पीठाचे शिष्य आहेत. या पीठाच्या जगद्गुरूंना ‘रावल’ या उपाधीने संबोधिले आहे. टेहरी नरेश यांच्या तिलकोत्सव समारंभात ही ‘रावल’ उपाधि बहाल करतात.

या केदारपीठाची गुरूपंरपरा अविच्छिन्न गतीने अनादी कालापासून चालत आलेली आहे. गढवालच्या इतिहासावरून पाहता, तीनशे चोविस जगद्गुरूंची नावे, समय याची माहिती मिळते. या पीठाचे ३२० वे रावल श्री श्री श्री १००८ जगद्गुरू नीलकंठलिंग शिवाचार्यांनी ऊखीमठ आणि गुप्तकाशीच्या मध्यभागी ‘उत्तराखंड विद्यापीठ’ नावाच्या शिक्षण संस्थेची स्थापना केली आहे. त्या संस्थेत संस्कृत, हिंदी, आयुर्वेद इत्यादीचे शिक्षण दिले जाते. त्याच्या स्मरणार्थ त्या विद्यापीठात रावल श्री १००८ जगद्गुरू नीलकंठशिवाचार्यांनी अमृतशिलेची प्रतिमा प्रतिष्ठापित करण्याात आली आहे.

ISBN No: 978-81-94206-6-0

नेपाळमध्ये भक्तपूर —भातवात येथे या मठाचा शाखामठ आहे. तेथेही तो 'जंगमवाडी मठ' या नावाने प्रसिद्ध आहे. त्या मठासाठीही विक्रम संवत् ६९२ ज्ये. शु. ०८ या दिवशी नेपाळचे महाराज विश्वमल्ल यांनी श्री मल्लिकार्जुन यतींना भूमिदान केले होते. त्या दानपत्राचा शिलालेख अद्याप त्या मठात उपलब्ध आहे. हल्ली त्या मठात गृहस्थ परंपरेचे जंगम वास्तव्य करतात.

अशाप्रकारे हे पीठ उत्तराखंडात आध्यात्मिक, सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रात मौलिक कार्य करीत आहे. या पीठाच्या अधिक माहितीसाठी गढवालचा इतिहास व श्री रामदास गौड यांनी लिहीलेले 'हिंदुत्व' या पुस्तकांचे अवश्य अवलोकन करावे.

**श्री जगद्गुरू पंडिताराध्य**

श्री जगद्गुरू पंडिताराध्य यांनी भगवान शिवाच्या आज्ञेनुसार वीरशैव धर्म स्थापन करण्यासाठी श्रीशैल आंध्रप्रदेश क्षेत्रात विराजमान असलेल्या श्री मल्लिकार्जुन ज्योतिर्लिंगातून चारही युगात भिन्न भिन्न नावांनी अवतार घेतला. कृतयुगात चतुरअक्षर शिवाचार्य, त्रेतायुगात चतुर्वक्त्र शिवाचार्य, व्दापरयुगात धेनुकर्ण शिवाचार्य आणि कलियुगात पण्डिताराध्य शिवाचार्य या नावांनी ओळखले जातात.

सुधाकुण्डाख्यसुक्षेत्रे मल्लिकार्जुनलिंगत:।

जनन पण्डितार्यस्य निवास: श्रीगिरौ शिवे।।

स्वायंभुव आगमाच्या या वचनानुसार यांनी वीरशैव धर्माचा तत्त्वप्रसार करण्यासाठी श्रीशैल येथेच पीठाची स्थापना केली ते श्रीशैलपीठ अथवा सूर्यसिंहासन या नावाने प्रसिद्ध आहे.

महर्षी सानन्द ज्यांनी पंचाक्षर मंत्रोच्चारण करून नरकातील समस्त प्राण्यांचा उद्धार केला होता. त्यांनी या पीठाचे व्दापारयुगातील आचार्य श्री धेनुकर्ण शिवाचार्य यांच्याकडून शिवतत्वाचा बोध घेऊन आपले जीवन कृतार्थ केले होते.

कलियुगातील आचार्य श्री पण्डिताराध्य धेनुकर्ण शाखा आणि वृषभगोत्राचे आद्यगुरू मानले जातात. या पीठाची गुरूपंरपरा अव्याहत चालत आलेली आहे.

**श्री जगद्गुरू विश्वाराध्य**

वीरशैव धर्माच्या स्थापनेसाठी श्री जगद्गुरू विश्वाराध्य काशीक्षेत्रातील विश्वनाथ ज्योतिर्लिंगातून प्रत्येक युगात अवतार घेत आले आहेत. कृतयुगात पंचाक्षर शिवाचार्य,

ISBN No: 978-81-94206-6-0

त्रेतायुगात पंचवक्त्र शिवाचार्य, व्दापरयुगात विश्वकर्ण शिवाचार्य व कलियुगात विश्वाराध्य शिवाचार्य या नावांनी ते प्रसिद्ध झाले.

काश्यां विश्वेश्वरलिंगे विश्वाराध्यस्य संभवः।

स्थानं श्री काशिकाक्षे श्रृणु पार्वति सादरम्।।

स्वायंभुव आगमाच्या या वचनानुसार वीरशैव तत्त्वप्रचारार्थ यांनी काशीत मठाची स्थापना केली. काशीपीठ अथवा ज्ञानसिंहासन म्हणुन ते संबोधिले जाते. हल्ली ते जंगमवाडी मठ या नावाने प्रसिद्ध आहे.

काशीमध्ये अत्यन्त पवित्र व 'आनन्दकानन' या नावाने प्रसिद्ध असलेल्या क्षेत्रात हा मठ विराजमान आहे. काशीखंडात या क्षेत्राचा महिमा वर्णन केला आहे. प्राचीन काळी या क्षेत्रात अनेक महर्षींनी तपश्चर्या करून आपापल्या नावांनी शिवलिंगांची स्थापना केली आहे. ती अद्याप विद्यमान आहेत. त्यांना अवलोकन करून आजकाल भाविक लोकसुद्धा आपल्या पूर्वजांच्या नावाने शिवलिंगाची स्थापना करीत असतात, हे स्थान हल्ली पाहणाऱ्यांना संपूर्ण लिंगमय प्रतीत होते.

सुप्रसिद्ध दुर्वासाऋषींना या पीठाचे जगद्गुरू विश्वकर्ण शिवाचार्यांनी शिवाव्दैत सिद्धांताचा उपदेश केला होता. या पीठाचे जगद्गुरू स्कन्दगोत्र व विश्वकर्ण शाखेचे आद्यगुरू मानेल जातात.

काशीचा हा जंगमवाडी मठसुद्धा अतिप्राचीन आणि ऐतिहासिक आहे. या मठाचे 'मल्लिकार्जुन जंगम' या नावाच्या जगद्गुरूंच्या कालात त्यावेळचे काशीचे शासक श्री जयनन्द देव यांनी विक्रम संवत् ६३१ मध्ये प्रबोधिनी एकादशीस भूमिदान केले होते. चौदाशे वषापूर्वीचे ते प्राचीन दानपत्र आजही मठात सुरक्षित आहे. मठाला दिल्या गेलेल्या जंगमपूरच्या त्या भूमीवर पंडित मदनमोहन मालवीय यांनी काशी हिन्दु विश्वविद्यालयाची स्थापना केली आहे. जयनन्द देवाच्या त्या दानपत्राची एक अनुदित प्रतिलिपि ताम्रपटावर कोरलेली आहे ती महाराजा प्रभुनारायण सिंह यांनी कोरविली आहे. तीसुद्धा मठात सुरक्षित ठेवण्यात आलेली आहे.

काशीचे जयनन्द देव यांनी दिलेल्या दानशासनावर घेण्यात येणाऱ्या आक्षेपावर 'व्योमकेश' यांनी 'नवनीत' पत्रिकेत लेख प्रकाशित करून प्रकाश टाकला आहे. त्यात त्यांनी 'काशीतील जंगमवाडी मठात सुरक्षित चौदाशे वर्षापूर्वीचा शासनादेश' असा

ISBN No: 978-81-94206-6-0

उल्लेख करून प्रमाणबद्‌ध नितीने आक्षेपांचे निराकरण केले आहे. विक्रम संवत् ६३१ मधील काशीचा राजा जयानन्द देव यांच्यासंबंधी माहिती काही इतिहास—ग्रंथात मिळत नाही. कारण पाचव्या शतकात कन्नोजच्या राजाने काशीवर अधिकार प्राप्त केला होता. या आक्षेपाचे उत्तर 'श्री व्योमकेश' यांनी पूढीलप्रमाणे दिले आहे —

'यह बात सही है कि पांचवी शती में कन्नौज के राजा ने काशी पर आधिपत्य स्थापित कर लिया था। किन्तु काशी के राजा कन्नौज राज्य के अन्तर्गत स्वायत्त—शासनाधिकारसंपन्न बने रहे।'

प्राचीन इतिहास—ग्रंथों में यथा गदाधर भट्टकृत 'विजय व्रजविलास' मे जयनन्द देव को काशी का राजा बताया गया है। 'जयनन्द देव को काशी का राजा बताया गया है। 'जयनन्द देव देवता के समान था। काशी के लोक उसको देवता तुल्य मानते थे। यह राजा अनन्त देव का पुत्र था। जयनन्द देव का पुत्र गोविंद देव हुआ, जो अत्यंत वीर और धीर था।' अत: संवत् ६३१ कि में जयनन्द देव का काशी का राजा होना निश्चित है।[२७] ही गोष्ट खरी आहे की पाचव्या शतकात कन्नौजच्या राजाने काशीवर आधिपत्य स्थापित केले होते. तथापि काशीनरेश कन्नौज राज्याच्या अंतर्गत स्वायत्त शासनाधिकारयुक्त होते.

प्राचीन ऐतिहासिक ग्रंथातील गदाधर भट्टकृत 'विजय व्रजविलास' या ग्रंथात जयनन्द देव यांना काशीचा राजा असल्याचे ग्रंथित केले आहे. 'जयनन्द देव देवतासमान होते. काशीचे लोक त्यांना देवसमान मानीत असत, हा राजा अनन्त देवाचा पुत्र होता जयनन्द देवचा पुत्र गोविंद देव हा अत्यंत वीर व धीर होता.'[२८] अत: वि. संवत् ६३१ मध्ये जयनन्द देव याचे काशीतील अस्तित्व निश्चित आहे.' या विषयाचा विस्तार त्या लेखातच पहावयास मिळेल.

या मठात हुमायु, अकबर, जहागीर, औरंगजेब आणि मुहम्मदशाह यांनी मठास वेळोवेळो दिलेली दानपत्रे आजही मठात मौलीक रूपात जीर्ण—शीर्ण अवस्थेत ठेवण्यात आलेली आहेत. जिल्हा कोर्टापासून अलाहाबाद हायकोर्टापर्यंत या सर्व दानपत्रांची छाननी करण्यात आली आहे.

---

[27] नवनीत वर्ष:३३, अंक ५, मई १९८४, पृ.१०६—१०७.

[28] विजय व्रजविलास, व्दितीय अध्याय छंद संख्या ५—६.

ISBN No: 978-81-94206-6-0

सर यदुनाथ सरकार यांच्यासारख्या ‘मोगलकाल विशेषज्ञ’ इतिहासकांनीही यांची सत्यता मान्य केली आहे. बनारस गॅझेटिअरमध्ये पृष्ठ १२३ वर या फर्मानाचा स्पष्ट उल्लेख आहे. या फर्मानात या मठास दिलेल्या भूमीदानाचा स्पष्ट उल्लेख आहे.

हुमायु बादशहाने मिर्जापूर जिल्हयातील चुनार नावाच्या स्थानांत जंगमवाडी मठाच्या जंगमाच्या सहाय्यार्थ तीनशे बिघे जमीन दान दिली होती. त्याच्यानंतरच्या सर्व बादशहांनी या फर्मानाचा स्वीकार करून अन्य फर्मान दिले. ते आजपर्यंत मठात आहेत. मोगल बादशहांची दानपत्रे १५३० ते १७८४ इ. पर्यंतचे आहेत. हुमायुनंतर अकबर बादशहाने ४८० बिघे जमीन दान दिली होती. अकबराची तीन फर्माने मठात आहेत. जहांगीरच्या कारकीर्दीतील दोन फर्माने आहेत. त्यात अकबराने दिलेल्या दानाची तपासणी व त्याचे समर्थन आहे. शाहजहान बादशहाची १६ फर्माने आहेत.

मोगलामधील सर्वात क्रुर व तथाकथित हिंदूद्रोही औरंगजेबाच्या संबंधी पुढील कथा प्रचलित आहे. औरंगजेब काशीत झाल्यानंतर त्याने मंदीराचा विध्वंस करण्याची मोहीमच उघडली मंदीरे उध्वस्त करीत तो जंगमवाडी मठास आला. मठात प्रवेश करताच त्याला भास झाला की भीमकाय काळी देवछाया त्याच्याकडे आपल्या इंगळासारख्या लाल नेत्रांनी त्याच्याकडे क्रोधाने पाहात आहे. त्याला गिळंकृत करील की काय अशी त्याला भीति वाटली साम्राज्य आणि सैन्यबलाने सुसज्ज असलेला बादशहाचा थरकाप झाला. तो गलितगात्र होऊन तात्काळ मठाच्या बाहेर आला मठ उध्वस्त करण्याचा विचार त्याला सोडुन द्यावा लागला. उलट औरंगजेबाने मठाला भूमि दान दिली. हस्ताक्षरयुक्त अस्सल दानपत्र मठात अद्याप सुरक्षित असून त्यात हे वर्णन केलेले आहे.

काशी जंगमवाडी मठाची गुरूपरंपरासुद्धा अक्षुण्ण गतीने चालत आलेली आहे. उपर्युक्त पाचही पिठाचे आचार्य ‘पंचाचार्य’ संबोधिले जातात. कलियुगाच्या प्रारंभी अवतीर्ण झालेले रेवणाराध्य, मरूळाराध्य, एकोरामाराध्य, पंडिताराध्य आणि विश्वाराध्य नामक पाच आचार्याकडून वीरशैव धर्माची स्थापना झाली आहे. या प्राचीन आचार्यांनी स्थापना केलेल्या मठांत वीरमाहेश्वर –जंगम वंशोत्पन्न ब्रह्मचारी बटुनाच पट्टाभिषेक केला जातो. हेच वीरशैव धर्माचे पाच जगद्गुरू होत. यांच्याशिवाय या धर्माचे जे गुरू आहेत, ते सर्व याच पंचाचार्यांच्या शाखा मठांचे अधिकारी व अनुयायी शिष्य आहेत.

ISBN No: 978-81-94206-6-0

अशाप्रकारे वीरशैवांची व्याप्ती मठ, मंदीर, सिद्धान्त यांच्या माध्यमातुन संपूर्ण भारतभर विस्तारलेली दिसते.

ISBN No: 978-81-94206-6-0

# स्मृतींचा परिचय

प्रणव दर्शनानंद चौसाळकर
नांदेड.
९४०४७८७७०४
pranavc452@gmail.com

स्मृती

"पूर्वानुभूतं यज्ञानमथ तत्स्मरणं स्मृतिः"।[i]

पूर्वी अनुभवलेल्या ज्ञानाचे स्मरण म्हणजे स्मृती. असे स्मृतीचे लक्षण भविष्यपुराणात आलेले आढळते तर उमेशचंद्र पांडेय यांच्या मताप्रमाणे कुमारिल भट्ट "पूर्वविज्ञानविषयज्ञानं स्मृतिरिहोच्यते"[ii] असे स्मृतीचे लक्षण करतात. वस्तुतः 'श्रुती' आणि 'स्मृती' या दोन्ही शब्दांचा अर्थ खूप व्यापक आहे. 'श्रुती' हा ज्या प्रमाणे वेद, ब्राम्हण, आरण्यक, उपनिषदे यांचा पर्यायवाची शब्द आहे तसा 'स्मृती' हा वेदांगे, धर्मशास्त्र, इतिहास, पुराणे इ. ग्रंथांचा पर्यायवाची शब्द आहे असे दिसून येते. 'श्रुती' या शब्दाबरोबर जेव्हा जेव्हा 'स्मृती' हा शब्द उच्चारतात तेव्हा तेव्हा तो व्यापक अर्थाने उच्चारला जातो.

"श्रुतिस्तु वेदोविज्ञेयो धर्मशास्त्रन्तु वै स्मृतिः" I[iii] मनुने स्मृतींना धर्मशास्त्र असे संबोधले आहे. म्हणजे लोकांना समजण्यासाठी, किंवा जनसामान्यांपर्यंत स्मृतींचे बीज रुजवण्यासाठी स्मृतींचे स्वरूप संकुचित केले असण्याची शक्यता नाकारता येत नाही. सध्याच्या काळात आपण स्मृतींना धर्मशास्त्राच्या स्वरूपात पाहतो. वस्तुतः पहायला गेले तर, स्मृतींनी वेदाचा अर्थ सांगितलेला आढळून येत नाही. तरीही स्मृतींनी जो सांगितला तो म्हणजे धर्म, असे आपली परंपरा आपल्याला सांगते. याचे कारण असे की, वेदांच्या नंतर वेदांवर आधारित जे काही 'धर्मसूत्र' रचिले गेले, ते धर्मसूत्र हेच स्मृतींच्या रचनेचे मूळ मानले गेले आहेत.

ISBN No: 978-81-94206-6-0

धर्मसूत्रे, गृह्यसूत्रे आणि श्रौतसूत्रे अशा तीन प्रकारची सूत्रे आहेत. आणि या सूत्रांच्या समुच्चयाने मिळून कल्पसूत्रे तयार होतात. त्यांनाच 'कल्प' असेही म्हणतात. कल्पसूत्र वेदाशी संलग्न आहेत. त्या कल्पसूत्रांमधील एक असणारे 'धर्मसूत्र' हे मानवाने कसे वागावे याचे नियम सांगतात. या धर्मसूत्रांमध्ये गौतम, बौधायन, आपस्तम्ब, हिरण्यकेशी, वसिष्ठ, विष्णु, हारित, शंखलिखित इ. अनेक धर्मसूत्रांचा समावेश होतो.

एवढे धर्मसूत्र असताना स्मृतींची रचना का व कशासाठी? याचे उत्तर असे आहे की, या धर्मसूत्रांची भाषा ही अतिशय प्राचीन आहे. त्यामुळे ती समजण्यास क्लिष्ट आहे. तसेच धर्मसूत्रात विषयांची सुसंबद्ध अशी संरचना आढळत नाही म्हणून स्मृतिग्रंथांची रचना केली गेली असावी. धर्मसूत्रांच्या मानाने स्मृतिग्रंथांमधील भाषा समजण्यास अतिशय सोपी आहे, तसेच स्मृतींमध्ये विषयनिहाय विभागांची संरचना केलेली आढळून येते. या स्मृतींमध्ये भारतीयपरंपरेनुसार चालत आलेल्या अनेक नियमांचे संकलन व्यवस्थितपणे करून ठेवलेले आहे असे दिसून येते.

स्मृतींचे विषय

स्मृतींचे विषय हे आचार, व्यवहार व प्रायश्चित्त अशा तीन प्रकारात विभागलेले दिसून येतात.

आचार – यात चातुर्वर्ण्यांची कर्तव्ये, चार आश्रमांची कर्तव्ये, षोडश संस्कार, कर्मकाण्ड इत्यादि विषयांचे वर्णन आलेले आढळते. तसेच मनुष्याच्या, समाजाच्या उन्नतीसाठी उपयुक्त असणारे आचार यांविषयी चर्चा या प्रकारात आढळते. साधारणपणे माणसाने काय करावे व काय करू नये हे सविस्तरपणे सांगितले आहे. माणसाच्या जन्मापासून ते मृत्यूपर्यंत, सकाळी उठल्यापासून ते रात्री झोपेपर्यंत माणसाने काय काय नियम पाळावेत याचे विस्तृतपणे विवेचन केलेले आहे. देशकालभेदाने बदलणारे कर्तव्य, सांस्कृतिक जीवन, संस्कार, नीति या गोष्टी या प्रकारात आढळून येतात.

ISBN No: 978-81-94206-6-0

व्यवहार – यात प्रामुख्याने खटले, न्यायालय, साक्षीदार, त्यांच्या साक्षी, गुन्हे व त्यांचे प्रकार–उपप्रकार, देण्यात येणारा दण्ड, वाद–विवाद, खरे–खोटे, भांडण–तंटे तसेच आपण ज्याला व्यवहार म्हणतो अशा विषयांचा म्हणजेच धन, जमीन, प्राणी, वस्तू यांसारखी चल–अचल संपत्ती, स्थावर–जंगम मालमत्ता, इत्यादि विषय, तसेच ऋण देणे–घेणे, उधार देणे–घेणे, वस्तू विकणे–विकत घेणे, इत्यादि विषयांचा उहापोह आलेला आपण पाहू शकतो.

प्रायश्चित्त – यात विविध पापांबद्दल असणाऱ्या परिणामांचा, प्रायश्चित्तांचा विचार केला गेलेला दिसून येतो. विविध व्रते, अशौच, श्राद्धादि विषय यांचा विचार यात केलेला दिसून येतो.

वर्णधर्म, आश्रमधर्म, राजधर्म, व्यवहारक्रम हे प्रत्येक स्मृतीचे आधार आहेत. परंतु एखाद्या स्मृतीमध्ये एखादा विषय महत्वपूर्ण मानून त्यावर भाष्य केलेले आहे तर दुसऱ्या स्मृतीमध्ये दुसऱ्या विषयावर. त्यामुळे प्रत्येक स्मृतीचे एक वेगळे महत्व आहे.

स्मृतींचे प्रकार

"भविष्यपुराणात स्मृतींचे, त्यांच्या स्वरूपाप्रमाणे ५ प्रकार सांगितलेले आढळतात. ते असे, १) दृष्टार्था २) अदृष्टार्था ३) दृष्टादृष्टार्थरूपा ४) न्यायमूला ५) अनुवादस्मृती." [iv] प्रत्येक स्मृती ही या पाच प्रकारांमध्येच अंतर्भूत होते. यांपैकी –

१ दृष्टार्था – षाड्गुण्य, सामदामादि, शत्रू, अध्यक्ष यांच्याविषयी ज्या स्मृतीत सांगितलेले असते ती दृष्टार्था. म्हणजे साधारणपणे या स्मृतीत राजधर्म, व्यवहार, न्यायदान, परराष्ट्रधोरण, इत्यादिक विषय आलेले असतात.

२ अदृष्टार्था – संध्यादिक नित्यकर्म करावेत, मांसभक्षण करू नये इत्यादि गोष्टी ज्यात सांगितलेल्या असतात. म्हणजेच चतुर्वर्णांचे साधारण धर्म,

ISBN No: 978-81-94206-6-0

कर्तव्य-अकर्तव्य, भक्ष्य-अभक्ष्य, प्रायश्चित्त इत्यादिक विषय या स्मृतीत आलेले असतात.

३ दृष्टादृष्टार्थरूपा – ब्रह्मचाऱ्याने पलाशदण्ड धारण करावा इत्यादि गोष्टी ज्यात सांगितलेल्या असतात. म्हणजे साधारणपणे निमित्तधर्म, एखाद्या ठराविक वर्णाने, ठराविक कार्यात करावयाची कर्मे, पाळावयाचे नियम, इत्यादिक विषय या स्मृतीत आलेले असतात.

४ न्यायमूला – जप, होम इत्यादि गोष्टीत विरोध असताना ज्यात विकल्प उपलब्ध असतात. कधी कधी धर्मशास्त्रात एकंच गोष्ट करावी आणि करू नये असे परस्परविरोधी विधाने देश,काल,परिस्थितीनुसार आलेले आढळतात. अशा वेळेस ज्या स्मृतीत विकल्प उपलब्ध असतील ती न्यायमूला स्मृती.

५ अनुवाद – यालाच अनूक्तवादिनी असेही म्हणतात. वेदात ब्रम्हचर्यात् प्रव्रजेत् असे सांगितले असताना, त्या ठिकाणी गृहात् प्रव्रजेत् किंवा वनात् प्रव्रजेत् हे मात्र सांगितलेले नसताना, ज्या स्मृतीत मात्र ब्राह्मणः प्रव्रजेत् गृहात् असे सांगते ती अनुवादस्मृती. म्हणजेच वेदात कधी कधी केवळ, एखादी गोष्ट करावी असेच सांगितलेले असते. असे असताना ती कधी, कुठे, कशी करावी याविषयी ज्यात सविस्तर मार्गदर्शन असते तिला अनूक्तवादिनी असे म्हणतात.

स्मृतींचा रचनाकाल

संस्कृत साहित्यात वेद हे सर्वात प्राचीन साहित्य मानले गेले आहे. त्यानंतर धर्मसूत्राचा क्रमांक लागतो व त्यानंतर स्मृतिग्रंथांचा. वेदांचा रचनाकाळ या विषयावर अनेक मतभेद आहेत. वेद पौरुषेय की अपौरुषेय या विषयावर सुद्धा अनेक मतभेद आहेत. त्यामुळे काही लोक वेदांचा रचनाकाळ निश्चित करतात. तर काही लोक वेदांना अनादि-अनंत मानतात. स्मृतींचे मात्र तसे नाही. स्मृती या पौरुषेय आहेत याबद्दल काही वाद किंवा मतभेद नाहीत. परंतु संस्कृत साहित्याच्या दुर्दैवामुळे इतर अनेक संस्कृत साहित्यासारखेच

ISBN No: 978-81-94206-6-0

स्मृतिग्रंथांच्या रचनाकालाविषयी निश्चित माहिती सांगता येत नाही. अनुमानावरूनच स्मृतिग्रंथांचा सुद्धा काळ ठरवावा लागतो.

आजपर्यंत अनेक विद्वानांनी स्मृतींचा काळ निश्चित करण्याचा प्रयत्न केलेला आहे असे दिसून येते. त्यांच्या अभ्यासानुसार त्यांनी काही निष्कर्ष जगासमोर मांडलेले आढळतात. विद्वानांच्या मतानुसार '६०० ई. पू. पासून आत्ता आत्ता १८व्या शतकापर्यंत स्मृतिग्रंथांची किंवा त्यावर आधारित ग्रंथांची निर्मिती होत राहिली. इतिहासकारांनी या स्मृतींच्या निर्मितीच्या काळाचे तीन खंड पाडले आहेत. पहिला खंड आहे – ६०० ते १०० ई.पू., तर दुसरा खंड आहे – १०० ते ८०० ई. व तिसरा खंड आहे – ९०० ते १८०० ई. इतिहासकारांच्या मतानुसार पहिला खंड हा स्मृतींचे मूळ ग्रंथ असलेल्या धर्मसूत्रांच्या निर्मितीचा काळ आहे. तर दुसऱ्या खंडात धर्मसूत्रांवरील व्याख्यास्वरूप काही महत्वाच्या स्मृतींची व तिसऱ्या खंडात इतर काही स्मृतिग्रंथांची व स्मृतिग्रंथांच्या संबंधित ग्रंथांची रचना झाली.'[v]

वस्तुतः स्मृतींच्या रचना व्हायला ई.पू. काळीच सुरुवात झाली असावी असे विद्वानांच्या मतांचा अभ्यास केल्यावर आपण म्हणू शकतो.

प्रो. जयकृष्णमिश्र लिखित 'धर्मशास्त्रस्यइतिहासः' या पुस्तकात जयकृष्णमिश्रांनी धर्मशास्त्रकारांची नावे, आनुमानित काळ, त्यांच्या कृती, टीका आणि टीकाकार अशी विस्तृत माहिती दिलेली आढळते.

स्मृतिसंख्या

वेगवेगळ्या विद्वानांनी स्मृतिकारांची संख्या अनेकविधा सांगितलेली आढळून येते. परंतु नेमकी संख्या किती हे अजूनपर्यंत कोणीही निश्चितपणे सांगू शकलेले नाही. व्यवहारमालाकार सुद्धा हेच सांगतात की, "एतदवधि धर्मशास्त्रकाराणां संख्यानियमश्च नावधारित एव वर्तते"[vi]। म्हणजे आत्तापर्यंत धर्मशास्त्रकारांच्या संख्येविषयी कोणताही नियम ठरवला गेलेला नाही. वरील सर्व विद्वानांच्या मतांचा अभ्यास केला असता, कुठेही मतैक्य आढळत

ISBN No: 978-81-94206-6-0

नसल्यामुळे, स्मृतींची नेमकी संख्या किती याविषयी नक्की काहीच सांगता येत नाही. त्यामुळे स्मृतींची नेमकी संख्या किती हे सांगणे शक्यच नाही. या विषयी 'स्मृतिचन्द्रिका' कार स्वतःच शंका उपस्थित करून स्वतःच उत्तर देतात. ते म्हणतात की, 'एखाद्या ऋषींनी एखादी संख्या सांगितली तर स्मृतींची संख्या फक्त तेवढीच आहे का?' म्हणजे उदा. पैठीनसी ऋषींनी स्मृतींच्या कर्त्यांच्या नावाचा उल्लेख करून त्यांची संख्या ३६ असे सांगितले. तर स्मृतिकारांची संख्या केवळ ३६ आहे का? यावर उत्तर सुद्धा तेच देतात. ते म्हणतात, 'मैवम्' असे नाही. असे असले असते तर 'वत्स, मरीचि, देवल, पारस्कर, पुलस्त्य, लिखित,' इ. इतर अनेक ऋषी स्मृतिग्रंथांचे कर्ते म्हणून ग्राहय धरलेच गेले नसते. ते तर स्मृतिग्रंथांचे कर्ते आहेत. कारण त्यांच्या स्मृतींना पण वेदमूलकत्व आहेच आणि "तत्र वेदमूलाः स्मृतयः" असे स्मृतिकार शंखांचे मत आहे. तसेच "वेदमूलत्वादेव धर्मप्रमाणाः स्मृतिग्रंथाः" असे सांगितलेले आहे. म्हणजे स्मृतिकारांची संख्या फक्त ३६ नाही, तर ३६ हा आकडा फक्त मोजमापासाठी वापरलेले एक साधन आहे, असे मानावे लागते.[vii] याचाच अर्थ असा होतो की, स्मृतींची निश्चित अशी संख्या सांगता येत नाही. विविध मान्यवरांनी ज्या संख्या सांगितलेल्या आढळतात त्या केवळ मोजमापासाठी वापरलेले एक साधन आहे. ती संख्या म्हणजे स्मृतिकारांची शेवटची प्रामाणिक यादी असू शकत नाही.

---

**संदर्भ**

[i] श्लो.६, अ.१८१, भ.पु.

[ii] पा.४, भूमिका, गौ.ध.सू.

[iii] श्लो.१०, अ.२, मनु.

[iv] पा.क्र. १९, वीरमित्रोदय परि.प्रका.

[v] स्मृतियों का रचनाकाल, धर्मशास्त्र, अ.१३, संस्कृत साहित्य का इतिहास.

[vi] व्यवहारमाल, निवेदना

[vii] स्मृतिचन्द्रिका, संस्कारकाण्ड, प्रमाणसाधनम्

ISBN No: 978-81-94206-6-0

# संस्कृत भाषेचे ऐकया साठी योगदान

प्रतीक्षा पांचाळ
एम.ए.व्दितीय, नेसुबो महाविद्यालय, नांदेड

संस्कृत हि आर्याची भाषा मात्र व्याकरणाने नियमबध्द असणारी हि भाषा नंतरच तयार झाली पाहिजे आधूनिक काळात असे ऐक्याचे जे कार्य इंग्रजीने केले होते आज संस्कृत म म्रतवत झाली असली तरी तिने भारतीय संस्कृतीला व भावनीक ऐक्याला जिवंत ठेवते. संस्कृत हि आर्याची भाषा आर्य संस्कृतीच्या प्रसाराचे ते एक प्रमुख साधन होते संस्कृत भाषा कशी तयार झाली ते सांगताना पाच्चात्यांच्या नादी लागलेली काहि जण म्हणतात. पहिल्यांदा मानवाला आपल्या तोंडातून ध्वनी येतात, हे कळले. त्या ध्वनीच्या खूणा, खूणाची चिन्हे आणि त्या चिन्हाचीच अक्षरे झाली. त्यातून बाराखाडी वस्तूची नावे अशा तर्हने सर्व भाषा अगदी संस्कृत भाषा हि निर्माण झाली. अर्थात हे सर्व खोटे आहे इश्वराच्या संकल्पाने हि सृष्टी निर्माण झाली. मानवाच्या निर्मितीनंतर मानवाला आवश्यक ते सर्वकाही त्या ईश्वरानेच दिले. एवढेच नह्वे,तर मानवाला काळा प्रमाणे पूढे जायची आवश्यता भासेल तेही घ्यायची त्याने व्यवस्था केली आहे.

सृष्टीच्या निर्मितीपूर्विच ईश्वराने मनूष्यप्राण्याला मोक्षप्राप्तीसाठी उपयोगी पडणारी आणि चैतन्याने ओतप्रोत भरलेली अशी एक भाषा निर्माण केली. या भाषेचे नाव आहे 'संस्कृत' 'स्त्री' या शब्दाकरीता नारी, वामांगिनी,विमा,योषिता असे अनेक शब्द संस्कृत मध्ये आहेत हा प्रत्येक शब्द स्त्रीची सामाजीक कौटुंबिक आणि धार्मिक भूमिका दर्शवितो. संस्कृत भाषेचे शब्द भंडार ऐवढे प्रचंड आहेकी त्याची माहीती द्यायला एक आयुष्य पूरे पडनार नाही.वाक्यात शब्द कोठेही असले, वाक्याचा अर्थ बदलत नाही. जिथे संस्कृतचे अध्ययन होते तेथे संस्कृती वास करते. देववाणी अशा या संस्कृती चे उच्चारजरी पटलेतरी आनंद वाटतो. 'संस्कृती संस्कृताश्रीता' असे म्हणतात. याचा अर्थ आहे, 'संस्कृती हि संस्कृतच्या आर्शयाला असते.' म्हणजे जिथे संस्कृतीचे अध्ययन होते तेथे संस्कृती वास करते.संस्कृतीचा अभियान करणारी व्यक्ती संस्कृतशील, सौजन्यशील असते. प्रचीनकाळापासुनच संस्कृत हि अखिल भारताची भाषा म्हणून ओळखली जात होती कश्मीरपासून लंकेपर्यंत वगांधार पासून मगधापर्यंत विद्यार्थी नालंदा तक्षशिला काशी आदी विद्यापीठातून अनेक शास्त्रे आणि विद्या यांचे अध्ययन करत या भाषेमुळे मंमट,कैयट या काश्मिरी पंडिताचे ग्रंथ थेट रामेश्वर पर्यंत प्रसिद्ध पावले आयुर्वेदातील चरक हा पंजाबचा सुश्रृत वाराणसीचा वाग्भट सिंधचा, कश्यप काश्मीरचा आणि वृंद महाराष्ट्राचा पण संस्कृतमुळे हे सर्व भारत मान्य झाले.

राष्ट्रभाषा कोणती असावी याकरता संसदेत वाघाला दक्षिण भारताने हिंदीला कडाडून विरोध केला. एक फ्रेंच तत्वज्ञ म्हणाला अरे तुम्ही कशाकरता भांडता संस्कृती तुमची राष्ट्रभाषा आहेत तीच सुरू करा. राष्ट्रभाषा संस्कृत सारखी देवभाषा तुम्ही घालवली मग भांडणे होणार नाही तर काय? आज हिंदुस्थानभरकहर आहे. या संस्कृत द्वेष्टांनी हे ध्यानात घ्यावे देववाणी चा ध्वज आता जागतिक

ISBN No: 978-81-94206-6-0

स्तरावर पोहोचला असून त्याचे सारे श्रेय साडेतीन टक्केवाल्यांना (ब्राह्मणांनाच) आहे. कुणी कितीही नाके मुरडली तरी सर्व भाषांची जननी असलेली संस्कृती असलेली संस्कृत भाषा पौर्वात्य च नव्हे तर पाचशे मेहतांनी आकर्षित करत आहे भारताचेच नव्हे तर जगाचीच मूळ भाषा संस्कृत आहे आणि तिच्यापासून निघालेले सर्व भाषा प्रकृत आहेत. संस्कृत ही देवभाषा असल्याने तिच्यात अपार चैतन्य आहे. ती अमृत आहे संस्कृत ही जशी सर्व भारतीय भाषांची जननी नाही तसेच ती एका धर्माची किंवा उच्चवर्णीयांची देखील नाही.

ती जनभाषा होती हे लक्षात घेऊन तिचे ज्ञानभाषा म्हणून असलेले महत्त्व आजही कायम आहे हे अधोरेखित करणारा लेख आजच्या संस्कृत भाषा दिनाच्या निमित्ताने भाषा हे निव्वळ अभिव्यक्तीचे साधन नसून ते मनुष्याच्या सामाजिक ओळखीचे एक महत्त्वाचे माध्यम असते. आणि संस्कृत भाषा या संदर्भातील सर्व भारतीय भाषांची अग्रणी ठरावी अशी स्थिती आहे. भारताचा इतिहास आणि संस्कृती यांच्याशी संस्कृती यांचा घनिष्ठ संबंध असल्याने परिस्थिती अधिकच नाजूक बनली आहे. त्यात गेल्या काही वर्षात संस्कृतीच्या प्रसारासाठी झालेले प्रयत्न प्रामुख्याने भावनिक पातळीवर सीमित राहिल्याने त्यातून काही वेळा अस्मितांच्या संघर्षाचे प्रसंग ही अगदी स्वाभाविकपणे निर्माण झाले. संस्कृती जगातील सर्वात प्राचीन भाषा आहे सर्व भारतीय भाषांची जननी म्हणजे संस्कृत भाषा सर्व युरोपीय भाषांचा उगम देखील संस्कृतातून झाला आहे.. संस्कृतीचे अनेक प्रकार आहेत महाभारत आणि रामायण भाषा महाकाव्य संस्कृत अधिक पुरातन आणि कमी सामान्य कृत आहे.

शास्त्रीय संस्कृत विस्तृत साहित्याची प्रामाणिक भाषा प्राचीन भारतीय व्या.करणानी वर्णन केले आहे. आणि विविध प्रकारच्या संस्कृतमध्ये मध्यवर्ती स्थान आहे. वैदिक संस्कृती उशिरा वैदिक ग्रंथाची भाषा तिच्या काळातील संस्कृतचा प्रभाव होता बौद्ध संकरित संस्कृत आणि जैन संस्कृती अनुक्रमे बौद्ध व जैन शास्त्रांच्या मध्य भारतीय भाषा आहेत. संस्कृत मध्ये खारोष्टी, कुशान, गुप्त, नागरी आणि देवनागरी यासारख्या ग्रामीण कडून आलेल्या विविध लिपी वापरल्या आहेत. भारताची प्राचीन भाषा वेदांची भाषा हिंदू धर्माची आणि प्रथम सहस्त्राब्धी तिच्या प्रारंभापासून व्यापक दर्शन आणि वैज्ञानिक साहित्य संस्कृती मृत भाषा आहे हे असेच एक शास्त्रीय पण अर्ध सत्य विधान आहे ज्या भाषेचा एकही मातृभाषेत जिवंत नाही. ती भाषा मृत मानली जाते संस्कृत ही प्रामुख्याने हिंदू धर्माची भाषा होती ती ब्राह्मणांनी स्वतःचे श्रेष्ठत्व जपण्यासाठी वापरलेली ब्राह्मणांची स्वतःची भाषा आहे. संस्कृती कधीच बोलीभाषा नव्हती अशी काही विधाने सांगता येतील हिंदू संस्कृतीचे श्रुती स्मृती पुराणे धार्मिक वांग्मय संस्कृतात आहे हे खरेच आहे. पण संस्कृतातील एकूण वांग्मयाचा तुलनेत या वांग्मयाचे प्रमाण फार मोठे नाही. संस्कृत ही निव्वळ धार्मिक साहित्याची भाषा नसून दक्षिण आशियातील भरलेल्या संस्कृती ची ज्ञानपरंपरेतील भाषा आहे.

ISBN No: 978-81-94206-6-0

ISBN No: 978-81-94206-6-0

# दिव्या गीर्वाणभारती।

मंजिरी पाठक
एम.ए.व्दितीय वर्ष
नेताजी सुभाषचंद्र बोस महाविद्यालय, नांदेड.

भाषासु मुख्या मधुरा दिव्या गीर्वाणभारती।
तत्रापि मधुरम काव्यम् तस्मादपि सुभाषितम्।।

वरील पंक्तीतून संस्कृत भाषेची प्रशंसा व्यक्त होते. संस्कृत भाषा म्हणजे देववाणी असे म्हणतात. सुसंस्कृत व्याकरण जेथे बद्द आहे ती संस्कृत भाषा.संस्कृत भाषेतील बरेच शब्द हे मराठी भाषेमध्ये जसेच्या तसे येतात. किंबहुना हिंदी भाषेत सुद्धा येतात म्हणूनच संस्कृत भाषेला भारतीय भाषांची जननी असे म्हटले आहे. संस्कृत भाषा ही शब्दांचे भांडार असलेली भाषा आहे.या भाषेत एका शब्दाला अनेक शब्द आहेत. उदाहरण द्यायचे झाले तर,पाणी या शब्दाला आप, तोय, उदक, नीर, जल ,पय, असे अनेक शब्द आहेत. अशी ही शब्दांनी समृद्ध असलेली भाषा आहे. वैज्ञानिक दृष्ट्या देखील संस्कृत भाषा खूप महत्त्वपूर्ण आहे.

संस्कृत भाषेचे उच्चारण लहानपणापासून केल्यामुळे वाणी शुद्ध व स्पष्ट उच्चार होतात. फार पूर्वी गुरुकुल पद्धतीत ऋषींच्या आश्रमात बोलण्यासाठी आणि शिकण्यासाठीही संस्कृत भाषेचा वापर होत असे.संस्कृत भाषेत लिहिलेले वांङमय हे फार प्राचीन आहे. कवि वाल्मिकी हे संस्कृत भाषेतील आद्य कवी होत. त्यांनी सर्वप्रथम रामायण हे महाकाव्य लिहिले. संस्कृत साहित्यात विपुल ग्रंथसंपदा असून वेद, उपनिषद ,पुराण ,शास्त्र,आयुर्वेद, धनुर्वेद,नाट्यशास्त्र हे संस्कृत भाषेचीच देणगी आहेत.

व्याकरणात पाणिनि यांचा अष्टाध्यायी ग्रंथ ,पतंजलि यांचे महाभाष्य, भर्तृहरी यांचे वाक्यपदीयम्,यास्क यांचे निरुक्त असे कितीतरी मौलिक ग्रंथ संस्कृत भाषेतच आहेत.आणखी एक गोष्ट मला सांगावीशी वाटते ती म्हणजे प्रथमा पासून संबोधन पर्यंत सर्व विभक्ती एका श्लोकात येतात आणि तो श्लोक म्हणजे रामरक्षेतील -
रामो राजमणि: सदा विजयते रामं रमेशं भजे।

रामेणाभिहता निशा चरचमू रामाय तस्मै नमः।

रामान्नास्ति परायणं परतरं रामस्य दासोस्म्यहम्।

रामे चित्तलय:सदा भवतु मे भो राम मामुद्धर।

हे सुभाषित आहे. संस्कृत मधील साहित्यदेखील अजरामर आहे.

ISBN No: 978-81-94206-6-0

भास, कालिदास, भारवि, माघ , यांच्यासारखे लेखक-नाटककार दंडी बाणभट्ट यांच्यासारखे गद्यकार यांचे योगदान संस्कृत साहित्यात मोलाचे आहे. संस्कृत नाटकात कवी कालिदास यांचे अभिज्ञान शाकुन्तलम् हे नाटक भारतातील लोकांमध्ये नव्हे तर पाश्चात्य मध्येही ही प्रिय आहे .त्यांच्या या नाटकासाठी एक उक्ती प्रसिद्ध आहे

काव्येषु नाटकं रम्यम् तत्र रम्या शकुंतला ।

परमेश्वरावर श्रद्धा हेच भक्ती करण्याचे एकमेव साधन आहे हे जा भगवद्गीतेमध्ये सांगितले आहे हे जी वाचल्याने मनाला शांती मिळते. सांख्ययोग सांगणारी ही भगवद्गीता ही संस्कृत भाषेचा देणगी आहे अशा या भगवद्गीतेमध्ये हे श्रीकृष्णांनी आत्मतत्वाचे वर्णन केले आहे.

नैनं छिन्दन्ति शस्त्राणि नैनं दहति पावक:।

न चैनं क्लेदयन्त्यापो न शोषयति मारुतः।

अशीही भगवद्गीता समस्त वैदिक ज्ञानाचे सार आहे. पतंजलीचा योगदर्शन हा ग्रंथही संस्कृत भाषेतच आहेत. त्यात त्यांनी यम नियम आसन प्राणायाम प्रत्याहार धारणा ध्यान समाधी अष्टोअङ्गानि।
अशी आठ अंगे सांगितली आहेत त्यालाच अष्टांग योग असे म्हणतात. अशाप्रकारे शब्दांनी समृद्ध असलेली ही संस्कृत भाषा ज्या भाषेतील उपनिषदे हि केवळ दार्शनिकप विचारांची नसून, त्यांचा संबंध आपल्या जीवनातील अनेक क्षेत्रांशी येतो.

समाजाचा नैतिक उपदेश यातच येतो. असे ज्ञान असे उपदेश ज्या भाषेत आहेत ती भाषा लोप पावत चालली आहे. ज्या भाषेत आपल्या वेद वांग्मय आहे ती भाषा कुठे आहे? खरोखरच सद्यपरिस्थितीत संस्कृत भाषेचा उपयोग केवळ परीक्षेमध्ये गुण मिळवण्यासाठी व्हायला लागला. संस्कृत भाषा शिकण्यासाठी विद्यार्थ्यांची मानसिकता बदलली पाहिजे. जेणेकरून जास्तीत जास्त विद्यार्थी संस्कृत शिकण्याकडे वळले पाहिजेत. संस्कृत ही भाषा शिकण्याची नसून त्यात जगता आले पाहिजे.

ही शिकवण आमच्या संस्कृतच्या शिक्षकांनी दिली आहे आणि ही गोष्ट अनुभवातूनच सांगता येते.

।। संस्कृताय नमो नमः ।।

ISBN No: 978-81-94206-6-0

ISBN No: 978-81-94206-6-0